यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - १९८६

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

923.60954
NAG
G04280

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04280
DATE: 8/6/2015

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष १५ वे १९८७

Y.C.P
923.60954/NAG
G04280
LIBRARY

□

प्रकाशन –

प्रा. बा. ह. कल्याणकर

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

यांच्या शुभहस्ते

दि. १३ मार्च १९८९

□

प्रकाशन स्थळ –

यशवंतराव चव्हाण स्मृती सदन

कराड नगरपालिका, कराड

□

प्रकाशक –

श्री. पांडुरंग दादासाहेब पाटील

अध्यक्ष

कराड नगरपालिका, कराड ४१५ ११०

□

मुद्रक –

श्री. गजानन रामचंद्र गिजरे

४०४/४०५ गुरुवार पेठ, कराड.

फोन नं २१५६

□

मुद्रण स्थळ –

लोकमान्य मुद्रणालय

४०४/४०५ गुरुवार पेठ, कराड ४१५ ११०

जि. सातारा

ग्रंथविश्वात रमणारे यशवंतराव

मनोगत

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेत सन १९८७ मधील साहेबांच्या जयंतीदिनी, महाराष्ट्राच्या तरुण पिढीतील एक व्यासंगी व थोर विचारवंत प्रा. डॉ. रावसाहेब कसबे, संगमनेर यांनी ' धर्म आणि इतिहास लेखन ' या विषयावर दोन प्रभावी व्याख्याने दिली आणि त्या विषयासंबंधीचे आपले सुस्पष्ट व परखड विचार कराडकरांना ऐकविले. त्याबद्दल आम्ही डॉ. कसबे यांचे आभारी आहोत.

आदरणीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी चालविलेले समाज प्रबोधनाचे व परिवर्तनाचे कार्य सतत तेवत रहावे या जाणिवेने १९७३ साली ' यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला ' सुरू करण्यात आली. पुढे काही सज्जनांच्या सूचनेवरून व्याख्यानमालेतील अभ्यासपूर्ण व्याख्याने पुस्तकरूपाने प्रकाशित होऊ लागली. ही व्याख्यानमाला याही पुढे अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा आणि त्यातील निवडक व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध करीत रहाण्याचा मनोदय आहे.

डॉ. कसबे यांचे ' धर्म आणि इतिहास लेखन ' व्याख्यानांचे हे पुस्तक लोकमान्य मुद्रणालयाचे संचालक श्री. गजानन गिजरे आणि त्यांचे कुशल व मेहनती कामगार यांनी वेळेवर तसेच सुबकपणे छापून दिले, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेच्या निमित्ताने जयंतीदिनी ज्यांच्या संबंधी 'उदंड आयुरारोग्य लाभो' अशी करुणा भाकावयाची ते सर्वांचे प्रिय यशवंतरावजी आज आपल्यात नाहीत, सर्वसामान्याविषयी अखंड आत्मियता बाळगणारा सर्वगुणसंपन्न नेता कृष्णाकाठी कायमचा विसावला ! त्यांच्याच पवित्र स्मृतीला हे पुष्प सादर समर्पण !!

कराड

पी. डी. पाटील
नगराध्यक्ष

‘ अंतरंग ’

दि. १२ मार्च १९८७ (व्याख्यान पहिले)

दि. १३ मार्च १९८७ (व्याख्यान दुसरे)

विषय : ‘ धर्म आणि इतिहास लेखन ’

मा. प्रा. डॉ. रावसाहेब कसबे
संगमनेर महाविद्यालय,
संगमनेर, जि. अहमदनगर

धर्म आणि इतिहास लेखन

डॉ. रावसाहेब कसबे

४ ' समता '
संगमनेर महाविद्यालय प्रांगण
संगमनेर - ४२२ ६०५
(जि. अहमदनगर)

भारतीय समाजमन सध्या त्याच्या इतिहासात कधीही नव्हते एवढे भयग्रस्त बनले आहे. त्याची कारणे विविध आहेत. समाजाची ही भयग्रस्तता फॅसिझमला आमंत्रण देणारी असते तर लोकशाहीवादी आणि समाजवादी शक्तींना एक आव्हान म्हणून स्वीकारावी लागते. जगातील सर्वच देशातील फॅसिस्ट शक्तीनी आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी धर्म आणि इतिहासाचा आधार घेतलेला आहे. आजच्या वास्तवाची कठोर चिकित्सा करण्याऐवजी जनतेत धार्मिक अहंकार वाढीस लावणे आणि इतिहासाचा अपलाप करून त्याचे कल्पनारम्य भव्य दिव्य स्वरूप मांडून जनतेला भूतकालाभिमुख करणे हे फॅसिस्ट शक्तींचे पहिले उद्दीष्ट असते. कारण त्यांना सामान्य जनतेला वास्तवाचा विसर पाडावयाचा असतो. ज्यांना ' माणूस ' केंद्रीभूत मानून समाज आणि राष्ट्र उभारणीचा विचार करावयाचा असतो त्यांना म्हणूनच जनतेला आपल्या वास्तव परिस्थितीची जाणिव करून द्यावी लागते. ही जाणिव करून देतांना समाजाचा विकासक्रम आणि या विकासक्रमात निर्माण झालेल्या संस्थांचे स्वरूपही स्पष्ट करावे लागते.

' धर्म आणि इतिहास लेखन ' या विषयावरील दोन व्याख्यानात हा प्रयत्न केलेला आहे. धर्मसंस्थेचा उगम आणि विकास, तिची विविध रूपे, तिचे सामर्थ्य आणि तिच्या मर्यादा यांचा विचार तर यात आहेच परंतु इतिहास लेखन कसे केले जाते, त्याचे वेगवेगळे दृष्टी-कोण कोणते आहेत, भारतीय इतिहास लेखनाचा विकास कसा झाला याही प्रश्नांची चर्चा आहे. हा विषय इतका अवाढव्य आहे की ही व्याख्याने म्हणजे एका अर्थाने प्रस्तुत व्याख्यात्याच्या ' धर्म आणि इतिहास लेखन ' या आगामी ग्रंथाची नांदी ठरावी अशीच आहेत.

डॉ. रावसाहेब कसबे

जन्म : १२ नोव्हेंबर १९४४, औरंगपूर, ता. अकोले, जि. अ. नगर

शिक्षण : सर्वोदय विद्यामंदिर राजूर व मॉडर्न हायस्कूल, अकोले तसेच महाविद्यालयीन शिक्षण अहमदनगर व संगमनेर येथील कॉलेज मधून. एम्. ए. राज्यशास्त्र, मराठवाडा विद्यापीठात सर्व प्रथम (सर्व शिक्षण मोलमजुरी व नोकरी करून पूर्ण)
पी. एच्. डी. पुणे विद्यापीठ.

नोकरी : सुरवातीस काही दिवस औरंगाबाद येथे व १९७३ पासून संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे राज्यशास्त्राचे प्राध्यापक.

गेली १५ वर्षे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर विविध ठिकाणी समाज प्रबोधनाच्या दृष्टीने व्याख्याने. अस्मितादर्श, समाजप्रबोधन पत्रिका, नवभारत, निकाय इत्यादि नियत-कालिकांतून सातत्याने सामाजिक, राजकीय व वाङ्मयीन विषयांवर वैचारिक लेखन. महाराष्ट्रातील तरुण विचार-वंतांतील डॉ. रावसाहेब कसबे हे एक आहेत.

प्रकाशित ग्रंथ संपदा-

१) 'झोत' (या पुस्तकाच्या ४ महिन्यात ३ आवृत्त्या प्रसिद्ध)
२) 'दलित चळवळीची वाटचाल'
३) 'आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना'
४) 'आंबेडकर आणि मार्क्स'
५) 'आंबेडकरवाद'

आगामी

१) भारतीय संविधानाचे स्वरूप आणि डॉ. आंबेडकरांची भूमिका
२) बुद्ध - मार्क्स आणि आंबेडकर
३) धर्म आणि इतिहास लेखन

'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथास प्रियदर्शनी अॅकेडमी आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांचे पुरस्कार प्राप्त.

फेब्रुवारी १९८७ मध्ये सोलापूर येथे झालेल्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.

रावसाहेब कसबे

धर्म आणि इतिहास लेखन

प्रा. डॉ. रावसाहेब कसबे

व्याख्यान पहिले

१२ मार्च १९८७

आपल्या नगर परिषदेचे अध्यक्ष मा. पी. डी. पाटील, आपल्या नगर परिषदेच्या समृद्ध ग्रंथालयाचे ग्रंथपाल माझे स्नेही श्री. विठ्ठलराव पाटील आणि बंधु भगिनींनो,

यशवंतरावजी चव्हाण हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर आपल्या देशाचे एक प्रमुख नेते होते. आपल्या देशात नेत्यांची वाण नाही. परंतु सुसंस्कृत, चिंतनशील आणि कलासक्त नेते आपल्याला फार थोडे लाभले आहेत. यशवंतरावजी अशा नेत्यांपैकी एक प्रमुख नेते होते. म्हणूनच राजकीय दृष्टीत मतभेद असणारी माणसेही त्यांच्यावर प्रेम करीत होती. राजकीय नेत्यांना समाजाच्या विविध स्तरातून असे प्रेम क्वचित मिळते. अशा या महान नेत्याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने होणाऱ्या या व्याख्यानमालेसाठी निमंत्रण देण्यासाठी जेव्हा ग्रंथपाल पाटील माझ्याकडे आले त्यावेळी हे निमंत्रण मी आनंदाने स्वीकारले. यशवंतरावजींचा महाराष्ट्र घडविण्यात फार मोठा वाटा आहे. त्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार मानले जाते. अशा नेत्याला व्याख्यानमालेच्या रूपाने आदरांजली वाहण्याची आपली कल्पना फार मोलाची आहे. ती महाराष्ट्राच्या इतर विभागांनाही अनुकरणीय ठरावी अशी आहे. आज आणि उद्या मी आपल्यासमोर 'धर्म आणि इतिहास लेखन' या विषयावर दोन व्याख्याने देऊन आपल्या उपक्रमात सामिल

होणार आहे. या विषयाला सुरुवात करण्यापूर्वी गेल्यावर्षी याच व्याख्यानमालेत जी व्याख्याने श्री. द्वा. भ. कर्णिक आणि आमदार रायभान जाधव यांनी दिलेली आहेत आणि ती आपण पुस्तक रूपाने छापली आहेत त्या पुस्तकाचे प्रकाशन झाले असे मी जाहीर करतो.

' धर्म आणि इतिहास लेखन ' हा एक अवाढव्य विषय आहे. या विषयावर आतापर्यंत इंग्रजी भाषेत विविध अंगांनी विपुल लेखन झालेले आहे. या विषयावर दरवर्षी अनेक ग्रंथ इंग्रजीत प्रकाशित होत आहेत. परंतु मराठी भाषेत या विषयावर फार थोडी पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. आपण भाषावार प्रांतरचनेच्या तत्वावर महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य स्थापन केले परंतु मराठी भाषेचा विकास करण्याकडे, ती विविध ज्ञानशाखांनी समृद्ध करण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. वैचारिक साहित्य मराठीत लिहिणे कमीपणाचे मानले जावू लागले आहे आणि एकविसाव्या शतकाला जेव्हा आपण मराठी लोक सामोरे जावू तेव्हा तर मराठीत कथा, कादंबऱ्या आणि कविता सोडून इतर ज्ञान-विज्ञान लिहिले जाईल की नाही याबद्दल माझे मन साशंक आहे. मराठी भाषेत हे सारे ज्ञान-विज्ञान यावे यासाठी सर्व स्तरातून जाणिवपूर्वक प्रयत्न होण्याची मला आवश्यकता वाटते. ती आपल्या समोर व्यक्त केल्याशिवाय राहवत नाही. तसे झाले नाही तर आज संस्कृत भाषेची जी दारुण स्थिती झालेली आहे तशीच मराठीचीही होईल आणि ज्ञान-विज्ञानाचा अभ्यास ही मूठभर आंग्लभाषिकांची मिरासदारी ठरेल. या ज्ञान-विज्ञानांचे पाझर मराठी भाषेच्या, आपल्या मातृभाषेच्या माध्यमातूनच सर्व सामान्यापर्यंत, बहुजन समाजापर्यंत जावून पोहोचू शकतील.

धर्म हा दहशतीचा विषय

गेल्या अनेक वर्षापासून धर्माचे एक अतिशय विचित्र रूप आपल्यासमोर आलेले आहे. ते केवळ भारतातच आलेले आहे असे नाही तर ही प्रक्रिया जागतिक स्वरूपाची आहे. आपण दोन धार्मिक गटातल्या दंगलींची हकीगत वर्तमान पत्रातून नेहमीच वाचतो. केवळ दोन वेगवेगळ्या धर्मांच्या समुदायांचा संघर्ष एक वेळ आपण समजू शकू परंतु एकाच धर्माच्या दोन पंथातील दंगलीही अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. ज्या महापुरुषाने टोकाची अहिंसा आणि त्याग शिकवला त्या महावीराच्या नावाने देवस्थानाच्या मालकीसाठी जेव्हा श्वेतांबर आणि दिगंबर कोयता, कुऱ्हाडी घेवून संघर्षाला बाहुया सावरीत असताना दिसतात त्यावेळी हा बाहुबली स्वतःला काय म्हणत असेल? जेव्हा एखादा बकरा ज्या झटक्यात कापला जातो त्याच झटक्यात अकाली आणि निरंकारी एकमेकांचे तलवारीने शिरच्छेद करतात त्यावेळी गुरु नानक आणि गुरु गोविंदसिंह यांच्या आत्म्याला किती वेदना

होत असतील ? जर त्यांचा आत्मा अविनाशी आहे असे मानले जात असेल तर. जेव्हा सुन्नी आणि शिया एकमेकांच्या कत्तली करतांना या दोहोंचाही ज्या खुदावर विश्वास आहे तो कयामतच्या दिवशी आपल्याला काय विचारील याचा कधी हे मुसलमान विचार करतात काय ? आणि हिंदूंचे- त्यांचे काम तर काही औरच आहे. जाती पोटजातीमधील सतत चालणाऱ्या संघर्षाचा तपशील म्हणजेच जणू हिंदूंचा इतिहास अशी अवनत आणि विकृत स्थिती आपण आपल्या इतिहासाला आणलेली आहे. या सर्व संघर्षात दोन्हीही बाजूकडील स्त्रिया या दंगलखोरांच्या वासनेच्या बळी ठरत आहेत. धार्मिक संघर्षात बलात्कार करणे हे पुरुषार्थाचे एकमेव कृत्य आहे असे मानून स्त्रियांशी दंगलखोरांची वागणूक असते. हे सारे आज आपल्या देशात उघडपणे आणि बेडरपणे चालू आहे. हे सारे धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीचे अपत्य आहे. हा धार्मिक पुनरुज्जीवनवाद केवळ मुसलमानांचा किंवा हिंदूंचाच आहे असे मानण्याचे काहीच कारण नाही. जगातले सारेच धर्म या पुनरुज्जीवनवादाची शिकार बनले आहेत. इतरांच्या पेक्षा आपण कोणीतरी वेगळे आहोत नव्हे श्रेष्ठ आहोत ही श्रेष्ठत्वाची अहंकारी भावना या पुनरुज्जीवनवादाच्या मुळाशी आहे. माणसाला अहंकारातून मुक्त करण्यासाठी तर धर्मांचा सारा खटाटोप आहे. अहंकार विरघळल्याशिवाय माणूस मुक्त होत नाही अशी साऱ्या धर्मांची शिकवण आहे. परमेश्वर आणि माणूस यांच्या दरम्यान अहंकार हाच एक मोठा पोलादी पडदा असून तो भेदल्याशिवाय माणूस मुक्त होवूच शकत नाही असा तर धर्मांचा दावा आहे. ज्या धर्मांनी परमेश्वराचे अस्तित्व मानले नाही त्यांनी सुद्धा सम्यक समाधी साठी अहंकाराचा त्याग ही पूर्वअट मानली आहे. मग या सर्वच धर्मांचे अनुयायी असे क्रूर का होत आहेत ? त्यांना रक्ताची चटक का लागली आहे ? त्यांना आपल्या श्रेष्ठत्वाच्या अहंकारांनी का ग्रासले आहे ? हे प्रश्न सामान्य माणसाला बेचैन करतात. परंतु हे आजचेच नाही. हे तर पूर्वापार चालत आलेले आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधताना भले भले थकून गेले आहेत. या प्रश्नांची उत्तरे ते प्रत्येक धर्माच्या धर्मग्रंथात शोधीत असतात. या साऱ्या संघर्षाची कारणे धर्मग्रंथात शोधणे हा शुद्ध वेडेपणा आहे. काही माणसे तर ' सर्व धर्म समभावाचा ' असा आव आणतात की त्यांना सारेच धर्म शांतता आणि अहिंसेचा संदेश देणारे वाटतात हे सारे धर्म मुळात फार चांगले आहेत परंतु त्यांचे अनुयायी मूर्ख आहेत अशी भूमिका घेवून त्यांना त्यांच्या धर्मातील उदात्त तत्वांची आठवण करून देणारे कीर्तनकार, मौलवी आणि पाद्री आजचेच आहेत असे नाही इतिहासात ते सतत जन्मलेले आहेत. आयुष्यभर त्यांनी उपदेश केलेला आहे परंतु तो सारा वाऱ्यावर गेलेला आहे. हे असे का होते ? आपल्या धर्माचा एकही धर्मग्रंथ वाचण्याची आवश्यकता त्या धर्माच्या अनुयायांना का वाटत नाही ? हा धार्मिक पुनरुज्जीवनवाद जन्माला

येण्याची कारणे धर्मात नाहीत तर ती सामाजिक आणि आर्थिक राजकीय परिस्थितीत आहेत. पुनरुज्जीवनवादी धर्मवेडाचे आकलन धर्मग्रंथांच्या वाचनाने होणार नाही तर हे धर्मवेड ज्या देशात आणि ज्या परिस्थितीत जन्मलेले असते त्या देशाच्या इतिहासाची आणि त्या परिस्थितीची माहिती करून घेतल्याने होते. अशी माहिती घ्यायला जेव्हा सुरुवात होते तेव्हाच धर्मचिकित्सेलाही सुरुवात होते. म्हणून तर धर्मवेडे फक्त धर्माची भाषा बोलत असतात. त्यांचे खरे दुःख सामाजिक, आर्थिक असते परंतु त्यांना सामाजिक, आर्थिक प्रश्नावर लढाई नको असते, त्यासाठी संघर्ष नको असतो. कारण तसे केले तर धार्मिक अहंकारांना तिलांजली द्यावी लागते आणि सर्व धर्मीयांना जे मिळेल त्यावर समाधान मानावे लागते. या धर्मवेड्यांना इतरांच्या पेक्षा अधिक हवे असते आणि ते प्राप्त करण्यासाठी किंवा इतरांच्या पेक्षा आपल्याकडे जे जास्त आहे त्याच्या सुरक्षिततेसाठी त्यांना परिस्थिती सतत युद्धमान ठेवावी लागते. या कामासाठी धर्माचा अतिशय कौशल्याने उपयोग केला गेलेला आहे. त्यासाठी त्यांना सतत दहशत निर्माण करावयाची असते. सामान्य माणसांच्या मनात सतत भीतीची भावना जागृत ठेवायची असते. कारण हे धर्मवेडे प्रत्येक धार्मिक समुदायात जसे अल्पसंख्य असतात तसेच ते हितसंबंधीही असतात. या हितसंबंधाचा आणि धर्माचा वस्तुतः काहीही संबंध नसतो. धर्मग्रंथांचा तर सुतराम संबंध नसतो. यासाठीच या धर्मवेडाची कारणे धर्म आणि त्यांच्या धर्मग्रंथांत न शोधता ती त्या त्या कालखंडातील विद्यमान परिस्थितीत शोधावी लागतात. जेव्हा आपण या धर्मवेडाची कारणे सामाजिक, आर्थिक परिस्थितीत समाजशास्त्रीय आणि अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून शोधू लागू त्यावेळी आपल्याला हा सारा वर्तमानकाळ समजावून घेण्यासाठी अपरिहार्यपणे इतिहासाचाही मागोवा घ्यावा लागेल. कारण कोणतीही विद्यमान परिस्थिती सुटी, स्वतंत्र कधीच नसते. ती समाज विकासाच्या टप्प्याचे एक अंग असते म्हणूनच तिला इतिहासाची एक विशाल पार्श्वभूमी प्राप्त होते. यासाठीच सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय वास्तव सुद्धा ऐतिहासिक दृष्टीच्या मदतीनेच समजावून घेता येते. त्यासाठी तर आजवरचे इतिहास लेखनही तपासावे लागते आणि ते कोणकोणत्या दृष्टीकोनातून लिहिले गेले याचाही विचार करावा लागतो. म्हणूनच या पहिल्या व्याख्यानात आपण धर्माचा, धर्मसंस्थेचा, तिच्या विकासाचा विचार करणार आहोत आणि उद्याच्या व्याख्यानात इतिहास लेखनाचा आणि त्याच्या विविध दृष्टीकोनाचा विचार करणार आहोत. हा विषय मी आपल्यासमोर सूत्ररूपाने मांडीत आहे त्यामुळे त्यात काही उणीवा राहणे शक्य आहे. जेव्हा पुढे कधी वेळ मिळाला तर तो विस्ताराने ग्रंथरूपाने संदर्भासहित मांडण्याचा विचार आहे.

धर्माचे स्वरूप

आजवर धर्मसंकल्पनेची चर्चा विपुल प्रमाणात झालेली आहे. अनेकांनी तर

धर्म म्हणजे काय हे नेमके सांगण्याऐवजी धर्म म्हणजे काय नाही हे विस्ताराने सांगितलेले आहे. आपल्याकडे 'धारयति सः धर्मः।' अशी धर्माची एक प्रसिद्ध आणि मान्यताप्राप्त व्याख्या आहे. जो समाजाची धारणा करतो त्याला धर्म असे म्हणतात असे ही व्याख्या आपल्याला सांगते. धर्माने आजवर समाजाची धारणा केली हे तर खरेच परंतु धर्माने व्यक्तीसाठी काहीच केले नाही का ? असा एक प्रश्न या ठिकाणी उभा करता येईल. धर्माला ज्या वेळी समाज धारणेचे प्रयोजन चिटकविण्यात येते, त्यावेळी या धर्माला आपण कायद्यांचे, नियमांचे, अमूक करा आणि तमूक करू नका या प्रकारच्या आज्ञांचे रूप देत असतो. कारण समाजाची धारणा या कायद्यांच्या, नियमांच्या आणि आज्ञांच्या शिवाय होवूच शकत नाही. कारण समाज हा केवळ व्यक्तींचा समूह नसतो तर विशिष्ट उद्देशाने एकत्रित आलेल्या व्यक्तींचा समूह असतो. आणि ही उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी समाजबंधनांची आवश्यकता असते. ही व्याख्या आपल्याला समाजबंधने म्हणजेच धर्म आहे असे सांगते. लोकमान्य टिळकांनी म्हणूनच ' गीता रहस्यात ' धर्म आणि कर्म यांच्यात अभेद मानला आहे आणि आंबेडकरांनी हिंदू धर्म हा आज्ञांचा एक समुच्चय आहे अशी त्यावर कडवट टीका केलेली आहे. तरी सुद्धा आंबेडकरांनी समाजधारणेसाठी धर्माची आवश्यकता नाकारलेली नाही. परतु टिळकांच्या समाज धारणेच्या स्वरूपात आणि आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या समाजधारणेच्या स्वरूपात आमूलाग्र फरक आहे. हा तपशिलाचा मतभेद आहे. मूळ प्रश्न धर्म समाजाची धारणा करण्यास आवश्यक आहे की नाही हा आहे. या प्रश्नाचे उत्तर आजवर परस्पर विरुद्ध विचारांच्या विचारवंतांनी सुद्धा ' होय ' असेच दिलेले आहे. याचे कारण मला वाटते धर्मसंकल्पनेच्या सामर्थ्याची त्यांना जी जाणिव झाली त्या जाणिवेत असावे. मला स्वतःला धर्माची ही व्याख्या परिपूर्ण वाटत नाही. म्हणजे या व्याख्येतून धर्माचे अंतरंग उलगडत नाही. त्याच्या अंतर्यामी असलेल्या सामर्थ्याची कल्पना येत नाही. या व्याख्येतून फार तर मानवी समाजाच्या विकासाबरोबरच आपल्याला धर्मसंस्थेचा विकासही स्पष्ट होतो. म्हणूनच अनेक विचारवंत धर्माचा दोन पातळ्यावर विचार करीत आलेले आपल्याला दिसतात. एक विचार व्यक्तीच्या पातळीवरचा आहे तर दुसरा समाजाच्या. त्यांच्या मताप्रमाणे आजवर धर्माने विविध बंधनांच्या सहाय्याने जशी समाज धारणा करून समाज विकासाच्या विविध टप्प्यात स्वतःला सतत बदलवीत आणले आहे तसे धर्माने व्यक्तीला सम्यक समाधीही प्राप्त करून दिली आहे. या व्यक्तींची संख्या लहान असेल. त्यांना अपवादात्मक व्यक्तीही म्हणता येईल. परंतु समाज धारणेशिवाय धर्म अधिक काही करूच शकत नाही असे मानले तर व्यक्तीच्या अंतर्मनात धर्म जी खळबळ माजवतो, व्यक्ती आपल्या मनाशी आणि बाह्य वास्तवाशी जो संघर्ष आणि संवाद करते त्या खळबळीची आणि संघर्ष संवादाची उपेक्षा

होईल. म्हणून ते आपल्याला बुद्ध आणि महावीर, कबीर आणि तुकाराम यांच्या सारख्या व्यक्तींच्या जीवनाची उदाहरणे देतात. व्यक्तीचा समाजाचा एक घटक म्हणून, एक अविभाज्य भाग म्हणून तिच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचा सुटा विचार करणे केवळ अशक्य आहे हे तर खरेच. परंतु प्राप्त परिस्थितीशी, दुःखमय जीवनाशी त्यांच्यात राहूनही अलिप्त होण्याची शक्ती माणसाला मिळविता येते असा त्यांचा दावा आहे. म्हणूनच धर्म ज्या प्रमाणे समाज धारणा करणारी एक संहिता असतो त्याच प्रमाणे व्यक्तीने स्वतःचा शोध घेण्याच्या, आपल्यात असलेल्या सामर्थ्याचा जर पुरेपूर उपयोग केला तर त्याला ते आत्मभान प्राप्त होवू शकते एवढेच त्यांचे म्हणणे आहे. या आत्मभानाच्या प्रवासाला ते 'धर्म' ही संज्ञा देतात. हा व्यक्तिचा व्यक्तीगत प्रवास असतो. म्हणूनच त्यांना धर्म हे मानवी जाणिवेचे सर्वोच्च उड्डाण वाटते, सत्यशोधनाचा तो वैयक्तिक मार्ग वाटतो, ती व्यक्तिगत अनुभूती वाटते. तुम्हाला व्यक्तीच्या बाह्य जीवनाची चर्चा करता येईल, त्याची चिकित्साही होवू शकेल, त्याचे वेगवेगळे अर्थही लावता येतील परंतु व्यक्तीच्या अंतर्मनाच्या अनुभूतीची तुम्ही चर्चा करूच शकणार नाही. हा मुळी चर्चेचा विषयच होवू शकत नाही, तो तर अनुभूतीचा विषय आहे. म्हणूनच ही अनुभूती, हे अंतःसत्य सामान्यज्ञानाचा विषय नाही. ते संवादापलिकडे आहे. ज्ञानेश्वरांनी तर त्याला 'शब्देविना संवाद' मानले आहे. जर शब्दच नसतील तर चर्चा आणि चिकित्सा कशाची करणार? त्याचे निरुपण आणि अन्वयार्थाचे सारे प्रयत्न निष्फळ आहेत. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथात जो बुद्ध उभा केलेला आहे तो सुद्धा ज्ञानप्राप्ती नंतर मौनात जावू इच्छित होता. कारण त्याला जी ज्ञानप्राप्ती झाली ती सामान्य जनतेला सांगण्यापलीकडची वाटत होती. परंतु या बुद्धाला ब्रह्मासंहपतीने बोलते केले. कशासाठी ? तर या जगाची पुनर्रचना करण्यासाठी, जग अधिक चांगले करण्यासाठी. या जगाची पुनर्रचना साधन संपत्तीच्या संबंधातील पुनर्रचनेत असते. त्यासाठी विविध संस्था उभ्या कराव्या लागतात. धर्माने सुद्धा आपल्या नावाखाली अशा संस्था निर्माण केल्याचा इतिहास आहे परंतु जगाची पुनर्रचना करण्यात आजपर्यंत तरी कोणत्याही धर्मांला यश आलेले नाही. धर्म जेंव्हा संस्थात्मक रूप धारण करतो त्यावेळी तो राजकीय संस्थांच्यापेक्षा गुणात्मक दृष्टया अजिबात वेगळा नसतो. संस्थात्मक धर्माचेच दुसरे नाव राजकारण असते, समाजकारण असते. या संस्थात्मक धर्माचा आणि व्यक्तिगत अनुभूतीचा काडीचाही संबंध नाही. धर्म जेव्हा एखाद्या संस्थेचे, संघटनेचे रूप धारण करतो त्यावेळी त्याचे स्वरूप राजकीय होते. म्हणूनच स्वतःला कडवट मुसलमान समजणारे, स्वतःला शुद्ध हिंदूच्या रक्ताचे समजणारे किंवा स्वतःला ख्रिस्ती समजणारे सत्यशोधक होवूच शकत नाहीत. सत्य त्यांच्यापासून खूप मैलांच्या अंतरावर असते तरीही सत्य

शोधल्याचा त्यांचा दांभिक दावा सतत चालू असतो. सारी प्रचारमाध्यमे त्यांच्या ताब्यात असतात. खरा धर्म हा हिंदू, मुसलमान किंवा ख्रिस्ती यांनी स्थापिलेल्या धर्मसंस्थेत नसतोच. त्या संस्था तर राजकीय असतात. त्यांची नावे धर्म सदृश असली तरी अंतरंग राजकीय असते. म्हणून तर त्यांनी युद्धांची निर्मिती केली. राजकारण्यांनी केली तशी. म्हणून तर त्यांनी देवांच्या नावावर लढाया केल्या, कोणाचा देव श्रेष्ठ आहे यावरून. आज उत्तर भारतात देवांच्या देवळावरून जो वाद सुरू आहे रामजन्मभूमी आणि बाबरी मशिदीचा तो मुळी धार्मिक नाहीच आहे. तो तर राजकीय आहे. म्हणूनच धर्माचा विचार दोन पातळ्यावर करावा अशी काही विद्वानांची सूचना आहे. एक व्यक्तिगत पातळीवर आणि दुसरा सामाजिक पातळीवर. जोपर्यंत व्यक्तिगत पातळीवरच्या धर्माचा प्रश्न आहे तोपर्यंत तो चर्चेच्या पलिकडचा विषय मानावा तो व्यक्तिगत अनुभूतीचा विषय मानावा. परंतु जोपर्यंत धर्म हा समाजधारणेचा विषय आहे तोपर्यंत त्याची चर्चा, त्याची चिकित्सा आवश्यक मानावी. कारण समाजधारणा ही समाजात व्यक्तीचे सामाजिक, आर्थिक स्थान निर्धारीत करीत असते. मार्क्स सुद्धा धर्म चिकित्सेला सर्वाधिक महत्व देतो तेव्हा त्याच्यापुढे हा संस्थात्मक धर्म आणि त्याचा ऐतिहासिक विकास असतो. धर्म हा एक खऱ्या अर्थाने मनोव्यापार आहे. हा मनोव्यापार जसा वैयक्तिक अंतस्थ असतो तसाच तो सामूहिकही असतो. बुद्धाला प्राप्त झालेली 'सम्यक समाधी' किंवा महावीराला प्राप्त झालेली 'अर्हतावस्था' किंवा तुकोबा चोखोबाची विठ्ठलावरील श्रद्धा हे सारे त्यांचे व्यक्तिगत मनोव्यापार आहेत. परंतु बौद्ध आणि जैन धर्म किंवा भागवत धर्म हा सामुदायिक मनोव्यापार आहे. त्यांना उदय आणि विकास आहे. त्यांना स्थलकालाच्या मर्यादा आहेत. म्हणून धर्माचा विचार करतांना वैयक्तिक आणि सामाजिक हा भेद सतत मनात ठेवावा लागतो. हा विचार मनात ठेवूनच चिकित्सा करावी लागते. ज्यांनी धर्माची खरी चिकित्सा केली त्यांनी हा भेद ध्यानी घेवूनच केली. ज्यांना प्रचाराची आणि धर्म श्रेष्ठत्वाची धुळवड खेळायची असते त्यांना या भेदाचे काहीही घेणे देणे नसते. बर्ट्रॉन्ड रसेल यांच्या धर्म चिकित्सेला महत्व प्राप्त झाले ते यामुळेच आणि आपल्या मराठी भाषेच्या मर्यादेत बोलायचे ठरले तर दि. के. बेडेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी आणि गं. बा. सरदार यांचे या विषयावरील लिखाण खोल विचार करायला लावते तेही यामुळेच. म्हणून आपल्यासमोर ज्या धर्मासंबंधी मी बोलत आहे तो सामाजिक आहे. ज्या धर्माने समाजधारणा होते त्या धर्मासंबंधीच आपण बोलू शकतो. हे सारे विवेचन आपल्यासमोर करण्याचे कारण धर्माच्या समर्थकांचे म्हणणे नेमके काय आहे तेही आपल्याला समजावे. ते समजावून न घेता त्याची टिंगल टवाळी करण्याची प्रवृत्ती साऱ्याच धर्मवेड्यांच्यामध्ये वाढते आहे. एकाने दुसऱ्याची टवाळी करण्यात काहीच अर्थ नाही. स्वतः

काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यावर दगड फेकू नयेत. सिद्धार्थ गौतम राजपुत्र होता. त्याला स्वतःच्या आणि समाजाच्या मुक्तीसाठी गृहत्यागाची प्रेरणा कोठून मिळाली ? या प्रश्नाचे आपण कोणतेही ऐतिहासिक अनैतिहासिक, खरे-खोटे उत्तर दिले तरी एकटा सिद्धार्थच घराबाहेर का पडला आणि तोच एकटा बुद्ध का झाला ? हा प्रश्न निरुत्तरीतच राहील. तुकाराम तर दारिद्र्यातच जीवन जगणारा संत होता. मग

ज्याचे अंतःकरण शुद्ध । त्यास करणे नलगे बोध ॥

हा अंतःकरणाच्या शुद्धीचा विचार तुकारामालाच का अनुभवता यावा आणि त्याच्या समकालीनांनी गुरुत्वाचा बाजार मांडून आपले जातीय अहंकार का कुरवाळावेत ? मला वाटते धर्माचा वैयक्तिक पातळीवर विचार केला तरच या दृष्टीने आपल्या हाती काही लागेल.

या दृष्टीने विचार करतांना मला असे वाटते की संन्यास किंवा या व्यवस्थेपासून अलिप्त होण्याचा प्रयत्न हा त्या त्या काळातल्या व्यवस्थेविरुद्धचे व्यक्तिगत पातळीवरील बंड होते. ज्या काळात ही व्यवस्था संघटितपणे बदलता येणे शक्य असते हा विचारच उगम पावलेला नव्हता आणि त्या दृष्टीने व्यक्तीचे सामर्थ्य तर मर्यादित होते. अशा वेळी संन्यासाशिवाय पर्याय नव्हता. या समाजव्यापारापासून अलिप्त राहण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. या सर्वांची कारणे तत्कालीन समाज व्यवस्थेत आपण शोधूही शकू परंतु हा एकट्याने केलेला प्रवास आपल्याला शब्दबद्ध करता येईल की नाही याबद्दल शंका वाटावी अशी परिस्थिती आहे. या व्यक्तिगत अनुभूतीला 'धर्म' का म्हणायचे हे मात्र समजत नाही. तिला धर्माऐवजी अन्य काहीतरी नाव दिले तर बराच स्पष्टपणे विचार करता येईल. परंतु धर्मसंस्थेचे प्रचारक आणि विरोधक या दोघांनाही ते आवडणारे नाही. धर्मसंस्थेच्या प्रचारकांना व्यक्तिगत धर्म आणि सामुहिक धर्म किंवा संस्थात्मक धर्म यांची सरमिसळ करून तो सामान्य माणसांच्या माथी मारावयाचा असतो. संस्थात्मक धर्माची सारी वैगुण्ये व्यक्तिगत उदाहरणे देवून त्यांना झाकायची असतात तर धर्मसंस्थेच्या विरोधकांना संस्थात्मक धर्माचा विकास स्पष्ट करतांना त्यांच्याकडून जे अत्याचार झालेले आहेत, जी अमानवी वागणूक सामान्य माणसांना मिळालेली आहे तिच्या सहाय्याने व्यक्तिगत धर्माचे ढोंग जनतेसमोर ठेवून समाज जीवनातून त्याचे उच्चाटन करावयाचे आहे. या ठिकाणी एका गोष्टीचे भान सतत ठेवावे लागते आणि ते हे की, व्यक्ती कितीही मोठो असो, ती कितीही शूर-वीर अथवा कर्तबगार असो, ती जीवन सर्वांगानी भोगणारी अथवा त्यापासून अलिप्त असणारी असो, ती अनुभूती घेतलेली अथवा अनुभूतीशून्य असो. अशी कोणतीही एकटी व्यक्ती इतिहासात इतर व्यक्तींच्या सहाय्याशिवाय काहीच करू शकत नाही.

इतर व्यक्तींचे सहकार्य असल्याशिवाय व्यक्तीला आपले कार्य करताच येणे शक्य नाही. आपण ऐतिहासिक पुरुषासंबंधी जेव्हा विचार करतो; मगते बुद्ध, महावीर, पैगंबर असोत, की नेपोलियन, शिवाजी, लेनिन असोत ; येशू, तुकाराम, कबीर असोत की राम, गांधी, आंबेडकर असोत; या सर्वांनी इतरांच्या सहाय्याने जे कार्य केले तेच आपल्या समोर असते. कोणत्याही महापुरुषाचा एक सुटी, स्वतंत्र, समाज-निरपेक्ष व्यक्ती म्हणून आपल्याला विचार करता येणार नाही. त्यांचे नाव इतक्या कालखंडानंतरही आपण घेतो आणि पुढील पिढ्याहीं घेतील कारण ते समाजाचा एक अविभिन्न भाग म्हणून जीवन जगले, समाजात राहिले. आपआपल्या विचारा-प्रमाणे त्यांनी समाज सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यांना त्यांच्या समकालीन जनतेने वंद्य मानले. जनता त्यांच्या बरोबर गेली म्हणून तर ते आपल्याला ज्ञात आहेत. ज्ञान प्राप्तीनंतर बुद्ध मौनात गेले असते, येशू जर परमेश्वराच्या साम्रा-ज्यात एकटाच रममाण झाला असता, गांधीजी आत्मशुद्धीसाठी हिमालयात गेले असते तर त्यांची नावेही आपणास ज्ञात नसती. परंतु जग बदलविण्यासाठी सिद्धार्थ बुध्द झाल्यानंतरही बोलला, येशूने सर्वसामान्यासाठी परमेश्वराच्या साम्राज्याचा दरवाजा खुला करण्याचा प्रयत्न केला आणि गांधीजींनी आपल्या स्वातंत्र्य चळ-वळीचे नेतृत्व केले म्हणून त्यांची नावे आपणास आठवतात. जे फक्त स्वतःसाठी स्वतःच्या मुक्तीसाठी जगले, तपश्चर्या केली अशा असंख्य अनामिकांची नावेही आपणास ठाऊक नाहीत. ती ठाऊक असण्याचे काही कारणही नाही. ज्यांची मुक्ती स्वतःपुरतीच मर्यादित होती त्या व्यक्तीची आणि तिच्या मुक्तीची चर्चा करण्यात आपल्याला स्वारस्य नाही. जे इतरांशी संबंधित असे काहीच करीत नसतात त्यांच्याकडून चुका होण्याची शक्यता नसते. परंतु ज्यांना समाजासाठी काही करावयाचे असते त्यांच्या कर्तृत्वातील चुका आणि शहाणपण पुढील पिढ्यांना सतत दिसत असते. कारण त्या व्यक्तीच्या चुका किंवा शहाणपणही नसते ते तत्कालीन समाज परिस्थितीच्या मर्यादांनी घडविलेले असते. म्हणूनच आपण व्यक्तिगत धर्माची चिकित्सा करू शकत नाही. केली तरी ती सर्वमान्य होईल याची खात्री नाही, परंतु आपण समाजासाठी स्थापन झालेल्या संघटीत धर्मांची, संस्थात्मक धर्मांची चिकित्सा करू शकतो. कारण त्यांना त्या त्या समाज परि-स्थितीत उगम आणि विकास असतो. त्याच बरोबर अंतही असतो. आज आपल्या समोर जे धर्म आहेत ते सारे संस्थात्मक, इन्स्टिटयूशनल, किंवा संघटित ऑर्ग-नाइज्ड धर्म आहेत. आपल्याला माहित नसलेले अनेक धर्म कालौघात नष्ट झालेले आहेत. त्यांची नावेही आपल्याला माहित नाहीत. काहींचे तर फक्त ऐतिहासिक अवशेष शिल्लक आहेत. म्हणूनच धर्माचा विचार करताना त्याच्या व्यक्तिगत आणि सामाजिक रूपाचे भान ठेवावे लागते.

धर्मचिंतक आणि धर्म ग्रंथ

काही विद्वान मंडळी वेदांना ज्ञानाचे भांडार म्हणतात आणि आपण सर्वच जण वेद वाचण्याची तसदी न घेता त्यांचे म्हणणे मान्य करीत असतो. वेद वाङ्मयाचा आता विविध अंगांनी अभ्यास होत आहे. वेदांचे जे अर्थ अद्याप लागतच नव्हते ते मोहेंजोदडो आणि हडप्पाच्या उत्खननाने लागू लागले आहेत. त्यामुळे सायनाचार्य आता अर्धे अधिक बाद ठरू लागले आहेत. त्यांनी वेदांचे लावलेले अर्थ किती काल्पनिक होते हे आता स्पष्ट होवू लागले आहे. हे सारे आधुनिक वाङ्मय आणि चित्रावशास्त्रींनी ऋग्वेदाचे केलेले मराठी भाषांतरही आपण वाचले तर वेदात काय तत्वज्ञान आहे याचा आपल्याला उलगडा होईल. आता शिक्षण सार्वत्रिक झाल्यामुळे हे प्राचीन वाङ्मय आपण मनात आणले तर आपण समजावून घेवू शकतो. ऋग्वेदात काही फार मोठे तत्वज्ञान असावे असे मला वाटत नाही. एखादे नासदीय सूक्तासारखे अपवादात्मक सूक्त सोडले तर त्यात काही तत्वज्ञान असावे असे दिसत नाही. परंतु हे प्राचीन वाङ्मय वगळ्या अर्थाने ज्ञानाचे भांडार आहे. आपले पूर्वज एके काळी कोणत्या अवस्थेत होते, त्यांच्या जीवनाचा आणि संस्कृतीचा विकास कसा झाला या साऱ्यांचा तपशील आपल्याला हे प्राचीन ग्रंथ देतात. हे आपलेच प्राचीन ग्रंथ देतात असे नाही तर जगातले सर्वच ग्रंथ आपापल्या भू प्रदेशाचा आणि त्यावर वास्तव्य करणाऱ्या मानव समूहाचा विकास स्पष्ट करतात. या जुन्या ग्रंथांना आपण विनाकारण पावित्र्याचा भावना चिटकवल्यामुळे हा विकास आपल्याला अद्याप नीट समजावून घेता आला नाही.

आपला प्राचीन ग्रंथ ऋग्वेद मानला जातो. त्यात 'धर्म' या शब्दाचा ज्या ज्या ठिकाणी उल्लेख आहे ता उल्लेखच मुळी समाज नियमनासाठी त्या काळात जे नीती नियम केलेले होते त्या नियमांच्या संदर्भातच वापरलेला आहे. पुढे छांदोग्य उपनिषदा सारखी उपनिषदे चार आश्रमांची विशिष्ट कर्तव्येच धर्म म्हणून सांगू लागली. तैतरीय उपनिषद जेव्हा 'सत्यं वद, धर्मं चर' असा उपदेश करते त्यावळी परंपरेने तुम्हाला जी कामे करायला सांगितली आहेत ती करणे म्हणजे धर्म असे तैतरीय उपनिषदाला म्हणावयाचे असते. भगवद्गीता तरी यापेक्षा वेगळे काय सांगते ? 'स्वधर्मे निधनं श्रेयः' याचा अर्थ काय आहे. ? याचा अर्थ चातुर्वर्ण्य व्यवस्थेप्रमाणे तुमच्या वाटयाला जे काम आले असेल, जे कर्म आले असेल ते कसेही असले तरी ते तुम्ही करणे म्हणजेच धर्म होय. मनू स्मृतीत तर हा धर्म फारच स्पष्ट झाला आहे. मनूस्मृतीने केवळ आज्ञा केल्या नाहीत तर त्या एखाद्याने मोडल्या तर त्याच्या वर्णाप्रमाणे त्याला कोणती शिक्षा द्यावयाची हे सुद्धा सांगून टाकले. हे काही हिंदुधर्मातच आहे असे नाही. याला कोणताही संस्थात्मक

धर्म अपवाद नाही. ख्रिस्ती धर्मात सिनाई पर्वतावर परमेश्वराने मोझेसला ज्या दहा आज्ञा दिल्या, 'दि टेन कमांडमेन्टस्' दिल्या त्यांचे स्वरूप तरी काय आहे. या साऱ्या गोष्टी त्यावेळी समाजाच्या धारणेसाठी आवश्यक होत्या. ही आवश्यकता त्या त्या प्रदेशात, त्या त्या कालखंडात, त्या त्या धर्माने पूर्ण केली. यासाठी तर विल्यम जेम्सला सुद्धा धर्माचे संस्थात्मक आणि व्यक्तिगत असे दोन भाग पाडूनच धर्माचा विचार करावा लागला. व्यक्तिगत धर्माला त्याने हृदयाचा धर्म मानले. या हृद-याच्या धर्माला देवाची, यज्ञाची, कर्मकांडाची आणि पुरोहित वर्गाची काहीही आवश्यकता नसते. तो जर हृदयाने हृदयाशी केलेला संवाद असेल तर त्या हृदयाशी ज्याचे हृदय संवादी होवू शकते त्यालाच त्या हृदयाची भाषा समजण्याची शक्यता आहे. ही भाषा न समजणारे जेव्हा आपले पांडित्य दाखवितात तेव्हा त्यांचे पांडित्य हृदयाला स्पर्श करणारे कसे असेल? हे सारे पांडित्य परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल किंवा कोणत्या मंत्रात काय सामर्थ्य आहे किंवा परमेश्वराकडे जाण्यासाठी पुरोहित वर्गाची किती नितांत आवश्यकता आहे याचे प्रदर्शन करणारे असते. या साऱ्या पंडितांना आपल्या विद्वत्तेचे आणि ज्ञानाचे प्रदर्शन करावयाचे असते. या साऱ्या पढीक विद्वानांनीच धर्म संस्था कमी अधिक प्रमाणात भ्रष्ट करण्यास हातभार लावला आहे.

प्रसिध्द तत्ववेता बर्ट्रॉंड रसेल यांनी आपल्या 'रिलिजन अँड सायन्स' या ग्रंथात एक सूचक वाक्य यादृष्टीने लिहिलेले आहे. त्याच्या मताप्रमाणे निव्वळ वैयक्तिक स्वरूपाचा धर्म विज्ञानाने खोटा ठरविता येईल अशी आग्रही मते मांडण्याचे टाळण्यात समाधान मानून राहील तेव्हा तो पराकोटीच्या विज्ञान-युगातही निर्वेधपणे राहू शकेल. परंतु अलिकडे आपल्या प्रत्येक क्षेत्रात असहिष्णू वृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येकाला आपलेच म्हणणे चिरंतन सत्य आहे असे वाटू लागले आहे. एवढेच नव्हे तर आपले म्हणणे इतरांनी स्वीकारलेच पाहिजे असा आग्रही आणि आक्रमक पवित्राही माणसे घेतांना दिसतात. सत्यशोधनाचे अनेक मार्ग असू शकतात यावरील विश्वास दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो आहे. हे सर्व घडण्याची कारणें आपल्या बिघडत चाललेल्या समाज परिस्थितीत आहेत. ही परिस्थिती जितकी अधिक बिघडेल तितके विविध हितसंबंधी गट अधिक आक्रमक होतील. त्यासाठी ते धर्माचा, भाषेचा, प्रदेशाचा आधार घेतील. हे सारे आधार अंतिमतः तकलादू स्वरूपाचे असतात. परंतु विशिष्ट परिस्थितीत ते भयंकर काही घडवून जातात. धर्माला पाकिस्तानच्या निर्मितीचे एक हत्यार म्हणून वापरता येते. धर्माला 'इस्लाम खतरेमें हैं' अशा घोषणा देवून किंवा 'हिंदू राष्ट्राचा' पुरस्कार करून राष्ट्र अस्थिर करण्याचे एक साधन म्हणूनही वापरता येते. याचा व्यक्तिगत धर्माशी काडीचाही संबंध नाही. याचा संबंध संघटीत राज-कारणाशी आहे. यासाठी तर आपल्याला संघटीत धर्माचे स्वरूप आणि त्यांचा

विकास समजावून घ्यावयाचा आहे. तो समजावून घेतला म्हणजे धर्माच्या नावा-खाली आज काय चालू आहे याची आपल्याला कल्पना येईल. ती कल्पना आपल्या देशातल्या जनतेला जितकी लवकर येईल तितके लवकर आपल्याला हे राष्ट्र वाचविण्याच्या योजना आखता येतील. नाहीतर आज आपले राष्ट्र एका प्रचंड ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे. सर्वच धर्माचे धर्मवेडे गट ज्या प्रकारे आज धर्माच्या नावाने राजकारण खेळत आहेत तो प्रकारच राष्ट्र उध्वस्त करणारा आहे. म्हणून या संस्थात्मक धर्मांची आपण थोडक्यात माहिती करून घेतली पाहिजे. खरे तर हे साऱ्याच सेक्युलर म्हणविणाऱ्या राजकीय पक्षांनी आणि संघटनांनी करण्याचे काम आहे. हे काम स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झाले नाही. त्याची किंमत आपण मोजलेली आहे आणखी किंमत मोजण्याची क्षमता आता सामान्य जनतेत उरलेली नाही. जर ती त्यांना कोणी मोजणे भाग पाडणार असेल तर तो सर्वनाश ठरेल.

धर्माचा उदय

धर्म हा माणसाचा एक मनोव्यापार आहे आणि हा मनोव्यापार जसा व्यक्तिगत तसाच सामुहिकही आहे याकडे जर आपण लक्ष दिले तर आपल्याला असा प्रश्न विचारावा लागेल की हा मनोव्यापार कशाबद्दलचा आहे ? त्या मनोव्यापाराचा विषय कोणता आहे ? माणसाची सारीच प्रगती प्रश्न विचारीत आणि त्यांची उत्तरे शोधीत झालेली आहे. आपल्या उपनिषदातही असेच प्रश्न उपस्थित केलेले आहेत. ज्यावेळी माणूस आदिम अवस्थेत होता त्यावेळीही त्याला प्रश्न पडत होते आणि आजच्या विकसित अवस्थेतही प्रश्नांनी त्याचा पिच्छा सोडलेला नाही. मानवी प्रगती बरोबरच नवनवे प्रश्न निर्माण होणारच. आजही जुन्या काळातल्या माणसाच्या मनात कोणते प्रश्न निर्माण झाले होते हे समजून घेतले तर ते प्रश्न आपल्याला अडाणीपणाचे वाटतील आणि त्यांची उत्तरेही आज आपले समाधान करू शकणार नाहीत.

यादृष्टीने या ठिकाणी आपल्या उपनिषदांपैकी 'केन' या उपनिषदाचे उदाहरण घेता येईल. केनोपनिषदात प्रश्न उभा केलेला आहे की वाणी म्हणजे भाषा कशापासून प्रकट होते ? या प्रश्नाचे उत्तर दिले आहे 'ब्रह्मापासून.' पुढचा प्रश्न आहे 'ब्रह्म कशाला म्हणतात ?' उत्तर आहे " ज्याला वाणी प्रकट करू शकत नाही परंतु ज्याच्यातून वाणी प्रकट होते त्याला ब्रह्म असे म्हणतात. " आपल्याला उपनिषदांतले हे सारे तर्कशास्त्र आज अजब वाटेल परंतु ते हजारो वर्षापूर्वीचे प्रश्न आहेत. त्यासाठी आपल्याला काळाचे भान ठेवावे लागेल आणि मग.....

" वाणी कशापासून प्रकट होते ? "
" ब्रह्मापासून "
" ब्रह्म काय आहे ? "
" ज्याच्यापासून वाणी प्रकट होते त्यास ब्रह्म म्हणतात " किंवा
" मन कशाच्या द्वारे मनन करते ? "
उत्तर आहे " ब्रह्माच्या द्वारे "
प्रश्न आहे " ब्रह्म म्हणजे काय ? "
उत्तर आहे " ज्याच्या द्वारे मनन केले जाते त्याला ब्रह्म म्हणतात. "
प्रश्न असतो " डोळे काय पाहू शकत नाहीत. "
उत्तर असते " डोळे ब्रह्म पाहू शकत नाहीत. "
पुन्हा प्रश्न असतो " ब्रह्म काय आहे ?"
उत्तर येते " ज्याला डोळे पाहू शकत नाहीत त्याला ब्रह्म असे म्हणतात "
या प्रकारचे प्रश्न माणूस विचारीत गेला आणि स्वतःचे समाधान होईल अशी उत्तरे मिळवीत गेला. परंतु माणसाचे समाधान कधी झालेच नाही. माणसात वसत असलेले असमाधान हा त्याच्या भौतिक प्रगतीचा एक महत्वाचा आधार आहे. म्हणून तर माणसे सतत प्रश्न विचारीत राहिली. बुद्धाला सुद्धा असाच प्रश्न विचारला गेला " भन्ते, स्पर्श करतो, स्पर्श करतो, कोण स्पर्श करतो ?" बुद्ध म्हणाले " हा प्रश्नच मुळी चूक आहे. स्पर्श कोण करतो हा प्रश्नच बरोबर नाही. सहा इन्द्रिये आणि त्यांचे विषय असल्यामुळे स्पर्श होतो. " बुद्धाचे हे उत्तरही काही आपोआप आलेले नाही. त्या उत्तराला त्यापूर्वीच्या शेकडो वर्षाच्या काळातील शेकडो प्रश्नांची आणि त्यांच्या समाधानकारक -असमाधानकारक उत्तरांची पार्श्वभूमी आहे. हा मानवी विचारांचा विकास आहे. आणि विकास पोकळीत कधीच होत नसतो. भदंत आनंद कौशल्यायन यानी उपनिषद्कालीन ऋषी ' ब्रह्माला ' कवटाळून अंधारात भटकत होते असे म्हंटलेले असले तरी त्यांच्या इमानदारीची त्यांनी प्रशंसा केलेली आहे. अलिकडे धर्मपंडितात जो खोटा बडेजाव आलेला आहे तो त्यांच्यात आलेला नव्हता. म्हणून तर ते म्हणत असत " मला हे माहीत नाही की मी त्याला जाणतो. मी हे सुद्धा म्हणू शकत नाही की मी त्याला जाणीत नाही. कारण थोडेसे तर जाणतो आहेच. आमच्यापैकी जो त्याला जाणल्याच्या गोष्टी करतो त्याला हे माहीत असते की तो जाणतोही आणि जाणीत नाही ही. "

उपनिषद् ऋषीची ही कबूली फार महत्वाची आहे. ही कबूली म्हणजेच माणसाच्या मर्यादांची कबूली आहे. माणूस एकटा कधी राहूच शकत नाही. जी माणसे एकटी राहतात ती परमेश्वर तरी असतात किंवा पशू तरी असतात असे म्हणतात. माणूस हा नेहमी समूहात राहणारा प्राणी आहे आणि समूहात राहिल्या-

मुळेच त्याला ' माणूसपण ' प्राप्त झालेले आहे. धर्म हा माणसाचा मनोव्यापार तर खराच परंतु हा मनोव्यापार कशाबद्दलचा आहे ? हा मनोव्यापार माणूस ज्या विश्वात राहतो ते विश्वच त्याच्या मनोव्यापाराचा विषय असते. या विश्वात आपले जगणे काही काळापुरतेच असते. पन्नास, साठ किंवा फारच झाले तर सत्तर वर्षांपेक्षा अधिक काळ आपण या विश्वात राहू शकत नाही. ही मृत्युची जाणीव माणसाला बेचैन करणारी असते. त्याला त्याच्या मर्यादांची, त्याच्या आयुष्याच्या क्षणभंगूरतेची जाणीव देणारी असते. परंतु त्याच बरोबर माणूस त्याच्या अस्तित्वा साठी, ते सुकर व्हावे म्हणून प्रयत्नशील असतो. त्याला या विश्वाच्या रहस्याचे गूढ उकलविण्याची अनिवार इच्छा असते. त्याच्या मर्यादाप्रमाणे तो ते उकल-विण्यात काही प्रमाणात यशस्वीही झालेला आहे परंतु त्याला विश्वाच्या गूढतेचे पूर्ण आकलन होणे शक्य झाले नाही. फार गोष्टी अद्याप त्याच्या आकलना बाहेरच्या आहेत. आपल्या मर्यादांची जाणीव माणसाला श्रद्धावान बनवते. साऱ्या व्यक्तिगत धर्मांचा उदय या मर्यादांच्या भानात होतो. परंतु हे भान सर्वांनाच येते का ? या प्रश्नाचे उत्तर देणे फार कठीण आहे. ते भान सर्वांनाच आले असते तर संघटीत धर्माची आणि राज्यसंस्थेची जरुरच मानव समाजाला उरली नसती. असे झाले असते तर हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन यासारखे संस्थात्मक धर्म बाद ठरले असते. आजपर्यंतच्या मानवी विकासाच्या वाटचालीत असे भान सर्व समूहांना कधी आल्याचा इतिहास नाही. फारच थोड्यांना ते आले. हेच सत्य आहे.

हे सारे खरे असले तरी माणसाला आपले जीवन सुरक्षित आणि सुखी करण्याचीही ओढ होती. ज्या निसर्गावर त्याचे जीवन अवलंबून होते त्याला काबूत ठेवण्याचा तो सतत प्रयत्न करीत आलेला आहे. त्यासाठी तर तो कळपाने राहू लागला. आपल्यातील पशूवृत्ती कमी व्हावी. आपले जीवन सुरक्षित असावे, आपल्याला जे जे हवे, आपण जे जे इच्छू ते सर्व आपल्याला प्राप्त व्हावे. आपल्याकड जे आहे ते सुरक्षित रहावे, ते सुरक्षित राहील यासाठी काही तरी करणे आवश्यक होते. माणसात शिस्त येण्यासाठी काही नियम घालून देणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांच्या जीवनाचे नियमन करणे आवश्यक होते. त्यासाठीच आज्ञा आणि कायदे हवे होते. सुरुवातीला ते नीतीच्या रूपानेच होणार होते म्हणून नीतीही ठरविणे आवश्यक होते. साऱ्या संस्थात्मक धर्माचा उगम या मानवी समाजाच्या आवश्य-कतेपोटी झालेला आहे.

संस्थात्मक धर्म

आपले महाभारत आपल्याला सांगते की,

न राज्यं न च राजाऽऽसीत न दण्ड्यो नच दण्डिकः ।
धर्मेणैव प्रजाःसर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ॥

याचा अर्थ राज्य नव्हते. आणि राजाही नव्हता, अपराधी नव्हता आणि त्याला शिक्षा करणारेही कोणी नव्हते. सर्वच समूह परस्पराचे रक्षण धर्माने करीत होता. धर्म हीच त्यांना समूहजीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे नियम देणारी शक्ती होती. धर्म आणि नीती नियमांचा उगम माणसाच्या या समूहजीवन जगण्याच्या आवश्यकतेत आहे. म्हणूनच धर्माविरुद्ध एवढी प्रचार मोहीम झाली तरी ते चिवटपणे अस्तित्वात आहेत. मानवाच्या मनात धर्मभक्तीला एक शाश्वत स्थान निर्माण झाले ते समूहजीवन जगण्याच्या आवश्यकतेतून. ही समूहजीवन जगण्याची आवश्यकता आपण धर्माऐवजी कोणत्या साधनाने पुरी करणार आहोत. यावरच धर्माचे भवितव्य अवलंबून आहे.

भारतात धर्माचा उदय कसा झाला हे शोधायचे म्हणजे भारतात आर्य कसे आले, त्यांचे इथल्या दास आणि दस्यू किंवा पणी या मूळच्या रहिवाशांशी संघर्ष कसे उडाले. त्यात आर्यांचा विजय होवून इथले मूळचे रहिवाशी आणि आर्य या दोहोंनीं मिळून समाज स्थिर करण्यासाठी कसे प्रयत्न केले याचा तपशील शोधणे होय. हा तपशील व्याख्यानातून आपल्याला सांगणे अशक्य आहे. भारतीय समाजात ज्या वेगवेगळ्या टोळ्या होत्या त्यांच्यात सामंजस्य निर्माण करून समाज सुस्थिर करण्यासाठी चातुर्वर्ण्य पद्धती, आश्रमधर्म, विवाहसंस्था इ. ज्या गोष्टी तयार केल्या त्या सर्वांना मिळून ' धर्म ' म्हणतात. यालाच पुढे वैदिक धर्म म्हणू लागले आणि तोच सनातन धर्म ठरला. हिंदू धर्म तर अगदी अलिकडचा शब्द आहे. आज आपल्यापैकी अनेकांना ' हिंदू ' या शब्दाने नवे चैतन्य आणले आहे परंतु हा शब्दच आपल्याला परकीय आक्रमकांची देन आहे. आपण सिंधूनदीच्या काठी राहणारे म्हणून परकीय लोक आपल्याला ' सिंधूलोक ' म्हणत परंतु त्यांचा ' स ' या शब्दाचा उच्चार ' ह ' होत असे. यूरोपीय भाषात ' स ' चा उच्चार ' ह ' होतो. त्यामुळे ते आपणास ' सिंधूलोक ' ऐवजी ' हिंदूलोक ' म्हणू लागले आणि तेंव्हा पासून आपण स्वतःलाही हिंदू म्हणवून घेऊ लागलो.

वास्तविक पाहता प्राथमिक अवस्थेतील धर्म म्हणजे चोदनालक्षणोऽर्थो धर्मः। या जैमिनीने सांगितलेल्या सूत्राप्रमाणे होते. हा धर्म समाजाने दिलेल्या आज्ञा पाळणे एवढ्यापुरताच मर्यादित होता. कणादाने धर्मासंबंधी

यतोऽभ्युदयनिः श्रेयससिद्धिः स धर्मः ।

असे म्हणलेले असले तरी कणादांनी सुद्धा उच्चतर सुखाची प्राप्ती ज्यापासून होईल तेच कर्म धर्म्य ठरविलेले आहे.

प्रसिद्ध फ्रेन्च समाजशास्त्रज्ञ एमिल दुरखाईम आणि मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्राईड या दोघांनीही धर्माची सामाजिक उपपत्ती देवकपूजा संप्रदायावरून, ' टोटेमिझम ' वरून झालेली आहे असे सांगितलेले आहे. दुरखाइम याच्या मताप्रमाणे

धर्म म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून माणसाने आचरण्याचे सामाजिक नियम होत. धर्म माणसाला आज्ञा देतो आणि जे विधिनिषेध सांगतो ते तर समाजाचेच विधिनिषेध आणि आज्ञा असतात. जुन्या काळात व्यक्तीने हे नियम स्वतः होवून स्वीकारले होते कारण त्यात व्यक्तीची सुरक्षितता होती. आणि या आज्ञा स्वीकारल्या नाहीत तर समाजाकडून वाळीत टाकण्याची, बहिष्काराची भीती होती. आजचे धर्मसंस्थेचे समर्थक नेहमी एक गल्लत करीत आलेले आहेत. त्यांना धर्म ही संस्था माणसाच्या मनात हे कायदे पाळण्याची प्रेरणा निर्माण करते असे वाटते. परंतु या प्रेरणेचा उगम नेमका कोठे आहे हे कळत नाही. माणसे या सर्व गोष्टी स्वतःची सुरक्षितता आणि आवश्यकता सांभाळण्यासाठी करीत असत. या गोष्टीकडे त्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होते आणि त्यांच्याकडून व्यक्तिगत धर्म आणि सामाजिक धर्म या धर्माच्या दुहेरी स्वरूपाचा विचार होत नाही. संस्थात्मक धर्माचा उदय हा समाजधारणेसाठी झालेला होता आणि समाजविकासाच्या टप्प्यात यासाठीच एका श्रेष्ठ व बलिष्ठ व्यक्तीला इतरावर हुकुमत गाजविण्याची शक्ती आणि अधिकार प्राप्त झालेला होता. समाज धारणेसाठी ज्या छोट्या मोठ्या संस्थांना माणसांनी जन्म दिलेला होता त्या साऱ्याच संस्था आपल्या कायद्यांनी, आज्ञांनी आणि नीती नियमांनी माणसाच्या नैसर्गिक स्वातंत्र्याचे दमन करीत होत्या. अशी माणसे भावनाग्रस्त मनोविकृतीने पछाडली नसली तरच नवल. म्हणूनच फ्राइडला धर्म हा भावनातिरेकग्रस्त मनाच्या विकृतीचे अपत्य वाटला.

धर्मसंस्थेने आजवर संस्कृती आणि नीतीनियम यांच्या ओझ्याखाली माणसाला यंत्रवत् बनवून टाकले आहे. माणसाचे माणूसपण नष्ट करून टाकलेले आहे. समाजधारणेसाठी आणि जीवनाच्या सुरक्षिततेसाठी माणसाने मोजलेली ही सर्वात अधिक किंमत आहे. ज्या दिवशी माणूस स्वयंशिस्त होईल आणि तो ही जोखडे फेकून देईल त्याच वेळी त्याला खऱ्या स्वातंत्र्याची प्राप्ती होईल. त्याला त्याचे माणूसपण प्राप्त होईल. प्राचीन काळी धर्मसंस्था ही जीवन सुरक्षित राहण्यासाठी निर्माण झाली आणि हे सारे जीवन त्यांच्या प्राथमिक गरजेत सामावलेले होते. ज्या काळात माणूस पशूपाल होता त्याकाळात त्याने मेंढयांच्या कळपांना आणि गाईच्या कळपांना पवित्र मानले. शेतीच्या शोधानंतर तो पेरणी आणि पीक कापणीचे उत्सव करू लागला आणि आज तर तो लक्ष्मीपूजन करीत आहे. आज आपण गणपती विसर्जनाच्या मिरवणूकीत आणि ताबूतांच्या गर्दीत धर्मसंस्थेचा हा जो मूळ उद्देश आहे तो पार विसरून गेलो आहोत. या धर्मसंस्थेच्या प्राथमिक स्वरूपाने टोळ्यांना, गणांना एकसंध केले. आपापला गण हा एकात्म आहे. आपली टोळी संघटीत आहे आणि ती इतरांच्या पेक्षा वेगळी आहे अशी दुहेरी जाणीव

धर्मसंस्था माणसांना देत गेली. यामागेही सुरक्षिततेचा आणि प्राथमिक गरजा पुऱ्या करण्याचाच भाग होता. धर्मात देवाचा शिरकाव फार उशीरा झालेला आहे.

धर्म आणि देव

प्राथमिक समाजातील विविध टोळ्यांच्या आणि गणांच्या धर्मांचा अभ्यास केलेले अभ्यासक आपल्याला असे सांगतात की त्या प्रत्येकांचे देवही वेगवेगळे होते. आपल्या देशात देवाच्या, परमेश्वराच्या संकल्पनेबद्दल फार हळवी मने आहेत. देवाचा आणि त्यावरील श्रद्धेचा जन्म माणसाच्या मनात झालेला आहे. जीवनाच्या आणि विश्वाच्या अनाकलनीयतेतून त्यांची निर्मिती झालेली आहे. देवाला माणसाने जन्म दिला. त्याची वेगवेगळी रूपे कल्पिली. त्याला वेगवेगळ्या पद्धतीने सजविले आणि त्याच्याच पुढे शरणागती पत्करली. कशासाठीं ? तर जीवनाच्या सुरक्षिततेसाठी आणि सुखाचे जीवन जगता यावे यासाठी. परंतु तरीही माणसांना सुखाचे जीवन जगता आले का ? सामान्य माणसांना सुख लाभले का ? या प्रश्नांची उत्तरे धर्माची निर्मिती कशी झाली हे समजल्यावाचून मिळणार नाही. या प्रश्नांची उत्तरे देण्याचा कार्ल मार्क्सने प्रयत्न केलेला आहे. मार्क्सने रोख ठोक सांगून टाकले की " धर्माची निर्मिती माणूस करतो. धर्म माणसाला निर्माण करीत नाही. ज्या माणसाला अद्याप स्वतःचा शोध लागलेला नाही किंवा जो माणूस स्वतःला पुन्हा हरवून बसलेला आहे. अशा माणसाची धर्म ही स्वयंजाणीव किंवा आत्मभाव असतो. परंतु माणूस काही या जगाच्या बाहेर अमूर्त रूपात अस्तित्वात असत नाही. माणूस माणसांच्याच जगात राहतो. हे जग म्हणजे समाज आणि राज्यसत्ता यांनी बनलेले असते. हा समाज आणि ही राज्यसत्ताच धर्माला जन्म देते हा धर्म म्हणजे जगाविषयीची उफराटी जाणीव असते. कारण हा समाज आणि ही राज्यसत्ताच उफराटी असते. अशा या धर्माचे सार, त्याचे तर्कशास्त्र, त्याचे अध्यात्म, त्याचा उत्साह, त्याचे नैतिक अधिष्ठान आणि गांभीर्य, त्याचे सार्वत्रिक दिलाशाचे स्त्रोत आणि समर्थन हे सर्व म्हणजे या उफराट्या जगाचा सामान्य सिद्धांत आहे. हा धर्म म्हणजे मानवी सारतत्वाची काल्पनिक जाणीव आहे. कारण या मानवी सारतत्वाला या समाजात आणि राज्यात खरे अस्तित्व नसते. " मार्क्स म्हणूनच आत्मशोधाची आणि आपल्या हरवलेल्या माणूसपणाची आपल्याला सतत आठवण करून देतो. हा आत्मशोध आपल्याला घेता येऊ शकतो आणि हरवलेले माणूसपणही पुन्हा प्राप्त होवू शकते असा विश्वास मार्क्स आप-ल्याला देतो. त्यासाठी तर तो क्रांतीची, जग बदलण्याची, जगाची पुनर्रचना करण्याची भाषा करतो.

मार्क्सवर आजवर आपल्या मराठी तथाकथित विचारवंतांनी फार अन्याय केलेला आहे. 'धर्म ही अफूची गोळी आहे' हे एक सुटे वाक्य घेऊन आणि जनतेच्या धार्मिक भावनेच्या आसऱ्याने जनतेच्या मनात त्याच्याबद्दल एक अनामिक तेढ निर्माण करून ठेवलेली आहे. परंतु मार्क्सला काय म्हणायचे आहे हे नीट समजावून घेणे आज आपल्याला फार जरुरीचे झालेले आहे. त्याला नीट समजावून घेतले नाही तर आज विविध धर्मांच्या मूलतत्ववाद्याविरुद्ध तुम्हाला वैचारिक आणि व्यावहारिक लढा करता येणार नाही. मार्क्स आपल्याला "धर्माविरुद्धचा लढा हा प्रत्यक्षपणे धर्म ज्या जगाचा अध्यात्मिक सुगंध आहे त्या उफराटया जगाविरुद्धचाच लढा आहे" असे सांगतो. धर्माने माणसाला कशी गुंगी आणलेलीआहे हे मार्क्सने त्यावेळीही मोठ्या साहित्यिक भाषेत सांगितलेले आहे. तो म्हणाला होता, "धर्माचे रूप घेतलेली दुर्दशा ही त्याचवेळी खऱ्या जीवनातील दुर्दशेचा आविष्कार असतो आणि तो खऱ्या दुर्दशेविरुद्ध व्यक्त झालेला निषेधही असतो. धर्म हा दुःखी मानवी प्राण्याचा निदिध्यास असतो. तो ज्याप्रमाणे चैतन्यहीन अवस्थेचे चैतन्य असते तसाच तो हृदयशून्य जगाचे अंतःकरणही असतो. धर्म ही लोकांची अफू असते." मार्क्सने सांगितलेली ही वस्तुस्थिती फार महत्वाची आहे. धर्म आणि देवांच्या निर्मितीनंतरही माणसाला सुख मिळाले नाही कारण त्याचे दुःख इथल्या सामाजिक व आर्थिक आणि राजकीय परिस्थितीतून जन्माला आलेले आहे. धर्माने माणसांना या परिस्थितीची विस्मृती होण्याइतपत गुंगी आणलेली आहे. माणसाला काल्पनिक सुख देण्याचे, आभासात्मक सुख देण्याचे जे सामर्थ्य धर्माजवळ आहे त्याकडे मार्क्सने कधीच दुर्लक्ष केलेले नाही.

म्हणून तर तो म्हणाला, "जो धर्म माणसाला काल्पनिक सुख देतो तो नष्ट करणे म्हणजे माणसाच्या खऱ्या सुखाची मागणी करणे होय. माणसाने काल्पनिक सुखाचा त्याग करण्यास सिद्ध होणे होय. ज्या समाजपरिस्थितीत या काल्पनिक सुखाची दुःखी मानवप्राण्यांना गरज वाटते तो समाजपरिस्थितीच नाकारण्यास सिद्ध होणे होय. म्हणून धर्मचिकित्सा ही धर्म ज्या दुःखितांच्या जगाचे आकर्षण असते अशा जगाच्या चिकित्सेचाच आरंभ बिंदू असते."

आपल्या इतिहासात आपण फार चुका केलेल्या आहेत. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपण जो राजकीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली ती तर सुरुवातीला सामाजिक परिषदेच्या बरोबरच काम करीत होती. आपल्याकडे सामाजिक सुधारणेचीही चळवळ थोड्याफार प्रमाणात झालेली आहे परंतु आपण या सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा संबंध धर्मचिकित्सेशी जोडू शकलो नाही. त्यामुळे आपल्या राष्ट्रीय चळवळीलाही वास्तवाचे सम्यक आकलन झाले नाही. जर राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीचा आणि सामाजिक सुधारणेचा धर्मचिकित्सेशी

सांधा जुळला असता तर हिंदु आणि मुसलमान, यांच्यात झालेल्या कत्तली टाळता आल्या असत्या. भारतीय राजकारणाला धार्मिक आधार प्राप्तच झाला नसता. शिख आणि अस्पृश्यांचेही सवते सुभे निर्माण झाले नसते. या धर्म चिकित्सेने आपल्याला वास्तवाच्या चिकित्सेचे भान दिले असते आणि आपण आपल्या इतिहासाची सम्यक चिकित्सा करू शकलो असतो. साऱ्याच धर्माच्या सामान्य माणसांना वेठीला धरल्याचे स्पष्ट झाले असते. साऱ्याच धर्माच्या राजांनी या सामान्य माणसांना कसे पिळले याचे आकलन झाले असते आणि ही चळवळ सामान्य जनतेची चळवळ झाली असती आणि ती राजकीय स्वातंत्र्याबरोबरच समाजव्यवस्थेतही परिवर्तन स्थापणारी चळवळ झाली असती. दुर्दैवाने हे झाले नाही. या उलट घडले. आपण हिंदूंच्या इतिहासाची ' सात सोनेरी पाने ' शोधू लागलो आणि मुसलमान आपल्या इतिहासात ' सुवर्ण युग ' बघू लागले. हिंदु राजांनी आपल्याच गरीब जनतेच्या किती तरुण मुली आपल्या जनानखान्यात ठेवल्या आणि मुसलमान राजांनी गरीब मुसलमान मुलींना आपल्या जनानखान्यात कसे डांबले याकडे आपले लक्षच गेले नाही. ही सोनेरी पानें सामान्य जनतेने आपल्या कष्टाने घडविली परंतु ती मूठभर राजांनी मोडून खाल्ली. हे सुवर्ण युग सामान्य जनतेने आपल्या घामाने घडविले परंतु हे सारे सोने, राजे, त्यांच्या बेगमा आणि त्यांचे सरदार यांनीच वाटून घेतले. हा सारा वेडेपणा आपण इतिहासात केलेला आहे. तो सुधारण्याची हीच वेळ आहे. धर्म आणि देव यांनी माणसामाणसात एकत्वाची भावना निर्माण करण्याऐवजी त्यांच्यात दुरावा निर्माण केला

देवाचा उदय हा प्रामुख्याने व्यक्तीपूजेतून झालेला असावा असे समाजशास्त्रज्ञ सांगतात. जगाच्या पाठीवर असे धर्मपंथ होऊन गेले की त्यांना देवाची आवश्यकता वाटली नाही. देवांचा उदय हा व्यक्तीपूजेतून झाला असावा हे सिद्ध करण्यासाठी हिंदू देव आणि देवता पुरेशा आहेत. इन्द्र हा आपल्या पूर्वजांचा पहिला देव. तो तर सप्तसिंधूचा पहिला सम्राट. आपला ऋग्वेद तर इन्द्राच्या स्तुतीने ओतप्रोत भरलेला आहे. वेद वाङमयाचा जवळ जवळ चौथा भाग इन्द्राने व्यापलेला आहे. हा इन्द्र त्याच्या आईचे कुमारी अवस्थेत जन्मलेले अपत्य आहे. ऋग्वेदाच्या चौथ्या मंडलाच्या अठराव्या सूक्तात आपल्याला इन्द्राची माहिती मिळते. त्यातल्या पाचव्या, दहाव्या आणि बाराव्या ऋचा वरून असे दिसते की कौशिक गोत्री कोण्यातरी लहानशा संस्थानिकाला एका कन्येपासून हा मुलगा झाला परंतु जन्माच्या वेळी त्या कन्येचा त्याने स्वीकार केला नाही. म्हणूनच ऋग्वेद आपणास सांगतो की,

कस्ते मातरं विधवामचक्रच्छयुं कस्त्वामजिद्यांसच्चरन्तं ।
कस्ते देवो अधि मार्डीक आसीदयत्प्राक्षिणा : पितरं पादगृह्य ॥

ऋग्वेद ४ । १८ । १२

" तुझ्या आईला विधवा कोणी केले ? निजला असता आणि फिरत असता तुला मारण्याला कोण पहात होता ? ज्या तू पित्याला पायाला धरून ठार मारलेस, त्या तुझ्याहून अधिक सुख देणारा अन्य दुसरा देव तरी कोणता आहे?" अशा प्रकारची ही इन्द्राची माहिती आहे. " आपल्या अब्रूला हानीकारक अशा समजुतीने आईने त्या सामर्थ्यसंपन्न इन्द्राला लपविले " असे याच सूक्तातील पाचवी ऋचा सांगते आणि दहावी ऋचा " गाईने वासराला जन्म दिला तद्वत इन्द्राला आईने दिला " असे म्हणते. याचा अर्थ असा कोणी करू नये की एकटा इन्द्रच गोठ्यात जन्मला. परम कारुणिक येशू ख्रिस्ताचा जन्मही यापेक्षा वेगळ्या पद्धतीने झालेला नाही हे ध्यानात घेतले पाहिजे. अशा या पराक्रमी राजाची स्तोत्रे तत्कालीन ब्राह्मणांनी आपल्या उपजीविकेसाठी रचली आणि आश्रयदात्या राजांच्या दरबारात ती गाऊन आपला उदरनिर्वाह केला. याचाच परिणाम इन्द्र राज्यपदावरून देव पदावर गेला.

इन्द्रानंतर ब्रह्मदेव आले. ऋग्वेदांत ब्रह्म म्हणजे प्रार्थनेचा मंत्र व ते मंत्र गाणारा तो ब्रह्मा. पुढेपुढे तर यज्ञ करणाऱ्या प्रमुख पुरोहितालाच ब्रह्मा हे नाव पडले. कालोघात जसजसे इन्द्राचे साम्राज्य नष्ट होत गेले तस तसे इन्द्राचे महत्व कमी झाले आणि त्याच्या जागी ब्रह्माचे नाव आले. पुढे त्याची इतकी स्तुती झाली की त्यालाच जगाचा कर्ता बनविले. एकदा देवांच्या स्तुतीचा उपयोग चरितार्थाचे एक साधन म्हणून करायचे ठरविले की यापेक्षा वेगळे काय होणार ? आपला महादेव हे तर शकांचे कुलदैवत होते. त्यालाही पुरोहित मंडळीनी जगाचा कर्ता बनवून पुजारीपण सुरक्षित ठेवले. आपल्या समाजातील विविध देवतांची स्थित्यंतरे आणि त्यांच्यातील बदल याचा आढावा घेतांना त्यांच्यावर पुरोहित वर्गाचा चरितार्थ अवलंबून होता याकडे दुर्लक्ष होऊ नये. राजा कोणताही येवो, तो कोणत्याही देशाचा असो, त्याचा धर्म कोणताही असो, त्याला जो देव रुचेल त्याची स्तुती करत राहणे व त्यादृष्टीने साहित्य निर्मिती करणे हेच आपल्या पुरोहितांचे काम होते. त्यावरच त्यांचे जीवन आणि समाजातील स्थान अवलंबून होते. त्यांच्यात स्वतःला परिस्थितीप्रमाणे बदलण्याची कला असल्यामुळे व ही कला त्यांना उपजोविकेसाठी प्राप्त करून घेणे भागच असल्यामुळे त्यांचे स्थान समाजात अढळ राहिले. मुसलमानी कालखंडातही अल्लोपनिषद लिहून हे स्थान त्यांनी कायम ठेवले.

हे साऱ्याच देशात घडले आहे. साऱ्या जुन्या धर्मपंथातील देव हे मानवीच होते आणि ते आपापल्या समाजापुरतेच मर्यादित होते. परमेश्वराचे रूप वैश्विक असू शकते हा खूप उशिरा आलेला विचार आहे. म्हणूनच आपल्या ऋग्वेदात

जशी इन्द्र आणि कृष्णांची घनघोर लढाई दिसते तशीच जुन्या करारात जोहोवाचे शत्रू म्हणजेच इस्त्रायलचे शत्रू. त्यातील प्रत्येक देवाने आपल्या लोकांसाठी आपल्या शत्रू विरुद्ध केलेल्या लढाया दिसतात. महंमदाने तलवार हातात घेतली ती सुद्धा फक्त आपल्या लोकांसाठीच. धर्माजवळ समाजातील आपल्या धर्माच्या गटाला एकात्म करण्याची प्रचंड ताकद आहे. त्याच बरोबर दुसऱ्या गटाशी शत्रूत्व, वैर सतत ठेवण्याचे समर्थनही आहे. त्यामुळेच विविध धर्म अस्तित्वात असलेले राष्ट्र कोणत्याही एका धर्माच्या नावाने एकात्म करता येणे फार अवघड आहे. त्यांच्यात लढाया होतील परंतु निर्णायक विजय कोणाचाच होणार नाही. त्यातून राष्ट्र तेवढे खिळखिळे होईल. यासाठीच राष्ट्रीय विचार करतांना धर्माच्या कवचाबाहेर येऊनच तो विचार करावा लागेल आणि धर्माजवळ आपल्या अनुयायांना एकात्म ठेवणारी शक्ती किंवा दुसऱ्या धर्माच्या अनुयायाबद्दल प्रचंड द्वेष असण्याच्या कारणाच्या मुळाशी त्या त्या धर्म गटाचे सामाजिक आर्थिक हितसंबंध असतात याकडे दुर्लक्ष होऊ नये.

देवाप्रमाणे भुतांनी सुद्धा या धर्माच्या क्षेत्रात फार नंगानाच घातलेला आहे. आपल्या देशात अद्यापही धनलाभासाठी किंवा दुसऱ्याचे वाईट होण्यासाठी माणसांना बळी देण्याची उदाहरणे घडत असतात. आजही आपल्या समाजात या घडणाऱ्या घटना म्हणजे आपल्या रूढी-परंपरांचे शिल्लक राहिलेले अवशेष आहेत. बायबलात सुद्धा ' चेटकीणीला जिवंत ठेवू नये ' अशी आज्ञा आहे. इ. स. १४८४ साली पोप आठवा इनोसन्ट याने यासाठी एक आज्ञापत्र काढले आणि गुन्हेगारांना शासन करण्याकरता आपल्या धर्म विचारिणी सभेच्या दोन अधिकाऱ्यांची नेमणूक केली. या गृहस्थांनी १४८९ साली ' स्त्री गुन्हेगारावर घणाघात ' या नावाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत प्रमाण ग्रंथ म्हणून मानला जात होता. या ग्रंथात म्हटले आहे की स्त्रियांची अंतःकरणे मूलतःच दुष्ट असल्यामुळे चेटुकाचे प्रकार पुरुषापेक्षा स्त्रियांच्याच हातून घडणे अधिक स्वाभाविक आहे. त्यांनी चेटूक केलेल्या स्त्रियांना विचारावयाच्या प्रश्नांची एक यादी केली आणि या स्त्रियांच्याकडून त्यांना हवी ती उत्तरे येईपर्यंत त्यांचा प्रचंड छळ केला. त्यांच्यासाठी एक खास पीडन यंत्रच तयार केले. या जाचाला कंटाळून संशयित प्रत्येक चेटकीण या अधिकाऱ्यांना अपेक्षित असलेली उत्तरे देऊ लागली आणि ज्यांनी चेटकीण असल्याची कबुली दिली त्यांना जाळून मारण्यात आले. या जाळल्या गेलेल्या असंख्य स्त्रियांची आकडेवारी बर्ट्रांड रसेल यांनी दिली आहे. ती अंगावर शहारे आणणारी आहे. इ. स. १४५० ते १५५० या कालावधित एकट्या जर्मनीत एक लाख स्त्रियांना जिवंत जाळले. हे साऱ्याच

ख्रिस्ती जगात घडले आणि धर्म त्याचा आधार होता. यापेक्षाही संघटीत धर्माने नीतीच्या नावाखाली माणसांचा जो अनन्वित छळ केला तो भयानक आहे.

धर्म आणि नीती

नीती हा शब्दच ' नी ' या धातुपासून बनलेला आहे. ' नी ' म्हणजे घेऊन जाणे अथवा वाहून नेणे. जी आपणास नेईल, आगुष्याच्या मार्गावरून नीट घेऊन जाईल अथवा वाहून नेईल ती नीती होय. नीतीला इंग्रजीत मॉरॅलिटी असा शब्द आहे. हा Morality शब्द Mores या लॅटीन भाषेतील अनेकवचनी शब्दा-पासून बनला आहे. Mores म्हणजे कोणत्याही समाजात प्रस्थापित झालेल्या व त्या समाजास मान्य असलेल्या चालीरीती अगर वागणुकीच्या रीती होत. जगातली सारी नीती ही समाजसापेक्ष आहे. समाजधारणेच्या आवश्यकतेतून ज्या रूढी समाजाने स्वीकारल्या त्याच पुढे धर्माने मान्य केल्या आणि त्याचे नीतीत रूपांतर झाले. त्यामुळेच समाज जसजसा बदलत गेला तशी त्याची नीतीही बदलत गेली. यहुदी आणि ख्रिस्ती नीतीशास्त्र हे मानव आणि देव यांचा संवादी संबंध साधणारे नीतीशास्त्र आहे. देवाची कृपा संपादन करणारे वर्तन म्हणजे योग्य व शुद्ध वर्तन होय असा मुलभूत सिद्धांन्त त्यात प्रस्थापित केलेला आहे.

जगातील सर्वच धर्मांची नीती ही थोड्याफार फरकाने त्या प्रत्येकाच्या देवशास्त्रावर, थिऑलॉजीवर आधारलेली होती. परमेश्वराचे अस्तित्व, त्याचे स्वरूप, त्याचे अवतार, त्याचे पुत्र किंवा दूत त्यांनी केलेले चमत्कार, त्यांना प्राप्त झालेले देवपण यावर या धर्मनीतीची मदार होती. परंतु विज्ञानाची जसजशी प्रगती होत गेली तसतशा या साऱ्या गोष्टी विचारी माणसाला भाकडकथा वाटू लागल्या. नव्या समाजधारणेसाठी त्यांना नीतीची तर आवश्यकता होतीच परंतु या नीतीला धर्माच्या तुरुंगातून स्वतंत्र करणे त्यांना आवश्यक वाटत होते. विज्ञा-नाच्या प्रगतीने साऱ्या धर्मसकल्पनानांच आव्हान दिले. ख्रिस्ती धर्माने सांगितलेली पृथ्वीची कल्पना आणि आपल्या पुराणांनी शेषाच्या फडीवर उभ्या केलेल्या पृथ्वीच्या कल्पनेला कोपर्निकस आणि गॅलीलीओने बाद करून टाकले. पृथ्वीची आणि माणसाची निर्मिती परमेश्वराने केली, ॲडम आणि इव्ह यांचा जन्म शुक्र-वारीच झाला कारण शनिवारी परमेश्वराने विश्रांती घेतली ही ख्रिस्ती धर्मश्रद्धा डार्विनच्या उत्क्रांतीवादाने खोडून काढली. पृथ्वीवर जीव निर्माण झाल्यापासून मनुष्यप्राणी निर्माण होईपर्यंत बराच कालावधी लोटला आहे. या डार्विनच्या म्हणण्याने धर्माने सांगितलेली उत्पत्ती कोलमडली. ' निसर्गाच्या निवडीची ' प्रक्रिया चालू राहिल्यामुळे प्राणीमात्र भोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेतात या

डार्विनच्या निरीक्षणाने परमेश्वर आणि त्याच्या दयाळूपणाबद्दल जे अंधःश्रद्ध युक्तीवाद रूढ होते त्यांना सोडचिठ्ठी मिळाली आणि माणूस हा विकास पावलेला प्राणी आहे. त्याची उत्पत्ती माकडापासून झाली हे सांगून डार्विनने सारेच धर्म खिळखिळे करून टाकले. या वैज्ञानिकांना धर्मपीठांनी फार त्रास दिला. त्याचा इतिहास सांगायला वेळ नाही तो रसेलने विस्ताराने सांगितला आहे. धर्मपीठांनी विज्ञानाविरुद्ध युद्ध केले. त्यावर दडपणे आणली. अमेरिकेसारख्या प्रगत देशात सुद्धा या विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत डार्विनचा उत्क्रांतीवाद तिच्या टेनेसीराज्यात शिकवायला कायद्याने बंदी होती. कारण तो 'परमेश्वरी वचनांच्या विरुद्ध' होता. अणूचे विभाजन होऊ शकते. नागासाकी आणि हिरोशिमा बेचिराख करून अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात हे सिद्धही केले होते परंतु आपली विद्यापीठे तरीही अणू हा सनातन आणि अविभाज्य आहे असेच शिकवीत होती ना ? कां ? कारण त्यांना आपल्या ब्रह्म तत्वाची भीती वाटत असावी. हे मानले तर ब्रह्मही विभाजीत होईल की काय या भीतीने आपल्या शिक्षणतज्ञांच्या उरांत धडकी भरली होती. अणूचे विभाजन होते हा शास्त्रीय विचार शिकवायला आपणही काही कमी वेळ घेतलेला नाही.

विज्ञानाच्या या प्रगतीमुळे चिकित्सक बुद्धीवादी दृष्टीकोनातून जेव्हा या साऱ्या धार्मिक संकल्पनाचे परीक्षण सुरू झाले त्यावेळी या संकल्पनांचा पायाच ढासळला. धार्मिक नीतीचाही त्यामुळें पाया ढासळला धर्मप्रधान नीती जी पारलौकिक कल्याणाची भाषा करीत होती ती सुस्थिर आणि सुव्यवस्थित होत चाललेल्या ऐहिक जीवनाने बंद करून टाकली. माणसांना पारलौकीक कल्याणापेक्षा ऐहिक कल्याण फार महत्वाचे वाटू लागले. त्यामुळे हळू हळू धार्मिक नीतीची जागा ऐहिकतावादी नीतीने घेतली. सुरुवातीला तिलाही धार्मिक संकल्पनांचे आवरण होते परंतु अलिकडे तेही हळूहळू गळून पडत चालले आहे. आज माणसांचे ऐहिक हित साधणे हेच नीतीचे उद्दीष्ट ठरले आहे. नीतीला धर्माच्या तुरुंगातून लवकरात लवकर सोडविले पाहिजे.

धर्माने जी नीती सांगितली ती त्याच्या संस्थेच्या किंवा पीठाच्या सुरक्षिततेसाठी, त्याच्या समृद्धीसाठी. संस्थात्मक धर्मांनी ऐतखाबूंचा एक फार मोठा वर्ग तयार केलेला आहे. हा वर्ग नेहमीच शोषकांच्या आणि सत्ताधाऱ्यांच्या बाजूने उभा राहिलेला आहे. त्याने सामान्यमाणसांचे आणि विशेषतः स्त्रियांचे जीवन बेचिराख केलेले आहे. त्यामुळे जे धर्माला एक फालतू बाब समजून त्याच्याकडे दुर्लक्ष करतात त्यांना समाज परिवर्तनाच्या चळवळी करता येणार नाहीत. त्यांना धर्माची एक सामाजिक शक्ती म्हणून, एक सोशल फोर्स म्हणून दखल घ्यावी

लागेल. त्याची चिकित्सा करावी लागेल. अलिकडे 'सर्वधर्मसमभावाचे' टाळ आपल्या देशात फार जोर जोरात कुटणे चालू आहे. त्यात फार मोठमोठी माणसे सामिल झालेली आहेत. जसजसे आपल्या देशात हिंदू-मुसलमानांचे, शिख आणि हिंदूंचे व सवर्ण आणि अस्पृश्यांचे दंगे तीव्र होत जातील तसतसा या 'सर्वधर्म-समभाव' पंथाला अधिक जोर येईल. आपले शासनही जेव्हा पार गोंधळून जाईल तेव्हा तेही या पंथाला आर्थिक मदत करील. हा सर्वधर्म समभावाचा पंथ म्हणजे वैचारिक गोंधळामुळे दिशाहीन झालेल्या मानवतावाद्यांचा पंथ आहे. त्यांच्या हेतुबद्दल मी शंका घेणार नाही परंतु त्यांचा कार्यक्रम शंकास्पद आहे. सर्व धर्म फार चांगले आहेत हे त्यांच्या विचारांचे सूत्र आहे. असा इतिहास मुलांना शिक-विला पाहिजे की ज्यामुळे कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. सगळेच धर्म जर फार चांगले आहेत तर मग त्यांचे अनुयायी या धर्मांच्या उदयापासूनच पशूप्रमाणे हिंसक का झाले ? इतिहासात जर हिंदु आणि मुसलमानांच्या राजकीय लढाया झाल्या असतील, ख्रिश्चन आणि मुसल-मानांची क्रूसेड्स् झाली असतील तर इतिहासकारांनी काय लिहायचे ? अफजल-खान आणि शिवाजी यांची भेट प्रेमाने आलिंगन देण्यासाठी झाली असे लिहायचे काय ? सुधारक मुसलमानांच्या नातेवाईकांना ते मेल्यानंतर सुद्धा दफन करण्या-साठी दफनभूमीत जागा नाकारणारे मौलवी प्रेमळ आणि उदार अंतःकरणाचे आहेत असे लिहायचे काय ? चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा, सतीचा, जातीसंस्थेचा आणि अस्पृश्यतेचा पुरस्कार करणारा शंकराचार्य हा मानवतेची पूजा बांधणारे महामानव आहे असे सिद्ध करायचे काय ? विधवेचा विटाळ होतो, तिची सावलीही अंगावर पडायला नको म्हणून इंदिरा गांधी सारख्या देशाच्या सर्वोच्च सत्तेवर जनतेने बसविलेल्या व्यक्तीशी शंकराचार्य खिडकीतून बोलतो त्याला जगाचा उध्दारकर्ता समजायचे काय ? असे अनंत प्रश्न विचारता येतील.

'सर्वधर्म समभाव' म्हणजे सर्वच धर्म चांगले असून त्यांना त्यांच्या मर्यादेत स्वायत्तता देण्याचा विचार आहे. या स्वायत्ततेनेच सर्वच धर्मांचे धर्मगुरु मस्तवाल झालेले आहेत. त्यांनी त्यांच्याच धर्माच्या सामान्य जनतेला आणि स्त्रियांना नाडलें, पिडले, त्यांच्या जीवनाची होळी केली तरी सर्वधर्म समभाववाले टाळकरी म्हणतील तो त्याचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यांनी फक्त दुसऱ्या धर्माच्या लोकांशी समभावाने रहावे एवढीच त्यांची अपेक्षा आहे. हा धर्मगुरुंच्या आणि धर्मपीठांच्या शोषणाला मान्यता देणारा विचार आहे. आज आपल्या देशापुढील जातीयवादी शक्तींचा मुकाबला करण्यासाठी या सर्वधर्म समभावाचा मार्ग चुकीचा आणि इतिहासाची चाके उलटी फिरवणारा आहे. त्यासाठी सेक्युलॅरिझम्, इहवादी दृष्टीकोण

स्वीकारणे हाच एकमेव उपाय आहे. आपल्याकडे सेक्युलॅरिझमचा सर्वधर्म समभाव असा अर्थ लावला जातो तोच मुळी चूक आहे. सेक्युलॅरिझमच्या या अर्थाला तर साऱ्याच मूलतत्ववादी मंडळींची मान्यता आहे. सेक्युलॅरिझम म्हणजे सर्वधर्म समभाव नव्हे तर इहवादी दृष्टीकोण म्हणजे सेक्युलॅरिझम होय. हा दृष्टीकोण साऱ्या संस्थांची चिकित्सा करणारा दृष्टीकोण आहे. धर्म संस्था ही सुद्धा सामाजिक आणि राजकीय संस्थेसारखीच एक संस्था आहे. ती सुध्दा त्यांच्या प्रमाणेच समाजावर प्रभाव टाकणारी संस्था आहे. तिने जगाचे आणि तिच्या पंखाखाली असणाऱ्या लोकांचे काय भले केले आणि कसे वाटोळे केले हे सांगणारा हा विचार आहे. या जीवनाचा, हे जीवन अधिक सुखी कसे होईल याचा आणि हे जीवन ज्या समाजात जगावे लागते त्या समाजाचा विकास, त्याची प्रगती कशी होईल हे सांगणारा हा विचार आहे.

म्हणून मूलतत्ववाद्यांचे आव्हान हे मुळी केवळ धार्मिक आव्हान नाहीच ते आर्थिक आणि राजकीय आव्हान आहे. त्या आव्हानाला सर्व धर्म समभावाची पताका खांद्यावर घेऊन सामना देता येणार नाही. त्याला सेक्युलर विचार घेऊनच सामना देता येईल. तुमचा व्यक्तिगत धर्म तुम्ही तुमच्या घराच्या उंबऱ्याच्या आत ठेवा. तुम्ही ध्यान धारणा करा, योग करा, विपश्चना करा, नमाज पढा हे सारे तुमच्या घराच्या आत. समाजजीवनातील तुमच्या संस्थात्मक धर्मामुळे होणारे हस्तक्षेप चालू दिले जाणार नाहीत. मला वाटते हेच या धर्माच्या विषाला एकमेव औषध आज उपलब्ध आहे. परंतु हा विचार केवळ विचार राहता कामा नये. हा विचार एक चळवळ होणे, मास मुव्हमेंट होणे आवश्यक आहे.

हे विसावे शतक जसे गतिमानतेचे शतक आहे तसेच ते अभिसरणाचेही शतक आहे. हा धर्म माझा नाही म्हणून त्याच्याशी माझे काहीच घेणे देणे नाही असे म्हणून आज चालणार नाही. सर्वच धर्मांच्या मूलतत्ववाद्यांशी सर्वच धर्मातील विचारी माणसांनी आज लढा देण्याची गरज आहे मुस्लीम मूलतत्ववाद्यांशी एकटे मुस्लीम सत्यशोधक लढू शकणार नाहीत. सती विरोधी एकटे पुरोगामी प्रवाह लढू शकणार नाहीत. आपल्या सर्वांनाच त्यांच्याशी लढावे लागेल. ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढणे फार सोपे होते. ही लढाई फार अवघड आहे. परंतु भारत राष्ट्राची एकात्मता आणि एकसंधता टिकविण्यासाठी ही लढाई आपल्याला लढावीच लागेल. आपण ती लढलो नाही तर एकविसाव्या शतकात जेव्हा भारत जाईल त्यावेळी त्याचे अस्तित्वच शिल्लक राहील कीं नाही याबद्दल शंका यावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

आज मी आपल्यासमोर धर्मासंबंधी, त्याच्या विकासासंबंधी आणि त्याने निर्माण केलेल्या प्रश्नासंबंधी थोडक्यात बोललो. यात अजूनही बोलण्यासारख्या

CHAVAN LIB MUMBAI

बऱ्याच गोष्टी शिल्लक राहिल्या आहेत याची मला जाणिव आहे. त्या पुन्हा कधी तरी विस्ताराने बोलता येतील. धर्म ही जशी एक समाज विघटनाची शक्ती आज बनलेली आहे. तसेच ' इतिहास लेखन ' ही सुद्धा त्या शक्तीला सहाय्य करणारी कृती ठरलेली आहे. म्हणून उद्याच्या भाषणात मी इतिहास लेखनाची चर्चा करणार आहे. आज एवढे बोलून मी थांबतो.

व्याख्यान - दुसरे

१३ मार्च १९८७

काल मी आपल्यासमोर धर्मासंबंधी, त्याच्या उदयासंबंधी, त्याच्या विविध रूपासंबंधी आणि त्याने निर्माण केलेल्या दहशतीसंबंधी सूत्ररूपाने बोललो आहे कालच्या भाषणाचा शेवट करतांना मी असे म्हणालो होतो की, समाज जीवनात इहवादी भूमिका घेतल्याशिवाय, सेक्युलर भूमिका घेतल्याशिवाय हे धर्मवेड आपल्याला समाजातून हद्दपार करता येणार नाही. आणि त्याशिवाय माणसाला खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगताही येणार नाही. परंतु ही इहवादी, सेक्युलर भूमिका आपण स्वीकारणार कशी ? ती केवळ स्वीकारतो म्हटल्याने स्वीकारता येत नाही. त्यासाठी आतून, मनातून आपली तयारी झाली पाहिजे. परंतु ही मनाची तयारी कशी करता येईल. ? ती करण्याचे अनेक मार्ग आहेत. ती होण्यासाठी अनेक गोष्टींची मदत होऊ शकते. हा सेक्युलर किंवा इहवादी विचार आपल्याला लवकर आकर्षित करीत नाही कारण लहानपणापासून आपल्या मनावर धर्माचे संस्कार कळत नकळत होत असतात. या संस्कारात सर्व धर्म सारखेच आहेत या पेक्षा माझा धर्म सर्वश्रेष्ठ आणि इतरांचे फालतू आहेत हाच संस्कार मोठ्या प्रमाणावर होत असतो. वाढत्या वयाबरोबर शूरवीरांच्या गोष्टी आणि त्यांनी केलेले धर्माचे रक्षण हा आपल्या जसा करमणुकीचा विषय होतो तसाच तो अस्मितेचाही विषय होतो. इतिहास लिहिणारांनी, ऐतिहासिक पुरुषावर व्याख्याने देणारांनी, कीर्तनकार आणि प्रवचनकारांनी आणि प्रामुख्याने ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांनी व नाटककारांनी आपल्या मनाची विशिष्ट वयात पकड घेतलेली असते. त्यातील फार थोडा मजकूर आणि फार थोडे बोलणे वस्तुस्थितीचे

निदर्शक असते. बाकी सारे स्वतःचे आणि समाजाचे अहंकार सुखावणारे आणि वाढविणारेच असते. या अहंकारी माणसांना मोक्ष तर अजिबात मिळणार नाही कारण सर्वच धर्मांनी मुक्तीची पूर्वअट अहंकाराचे विसर्जन ही सांगितलेली आहे. परंतु आपापल्या धर्माच्या नावाने विविध स्तरावर विविध पद्धतींनी ओरडणाऱ्यांना मोक्षाची गुळी काळजीच नाही. त्यांना तर धर्मरूढींनी मिळालेल्या सुरक्षिततेची, सामाजिक प्रतिष्ठेची, संपत्तीचीच अधिक काळजी असते. आपल्याकडे खरा इतिहास सांगणारी माणसे फार थोडी आहेत. मराठी भाषेत तर इतिहासाचार्य राजवाडे, वा. सी. बेंद्रे, त्र्यं. शं. शेजवलकर, स. अ. आळतेकर, न. र. फाटक, ग. ह. खरे, सरदेसाई, दत्तोपंत आपटे यांच्यासारख्या हाताच्या बोटावर मोजणाऱ्या व्यक्तींनी इतिहास लेखन केलेले आहे. त्यात खरे किती आणि खोटे किती हा विवाद्य प्रश्न आहे. प्रत्येक माणसाला आपला इतिहास माहित असावा. इतिहासाच्या नावाने ज्या भाकड कथा सांगितल्या जातात त्यांना इतिहास म्हणता येत नाही.

आमच्या संगमनेर गावात नव्या शैक्षणिक धोरणाप्रमाणे इतिहास कसा शिकवायचा यासंबंधी हायस्कूलच्या शिक्षकांचे शिबीर चालू होते. या शिबिरात एका सत्रासाठी मलाही बोलावले होते. हे नवे शैक्षणिक धोरण समजावे म्हणून मी उत्सुक होतो. तिथे चाललेली चर्चा ऐकल्यानंतर तर मी चक्रावूनच गेलो. त्या ठिकाणी शिक्षक जमलेले होते. ते शिक्षक असले तरी माणसेच असतात आणि त्यांच्यावरही या साऱ्या प्रचारी गोष्टींचा प्रभाव होता. त्यामुळे साहजिकच अभिनिवेशही होता. या शिक्षकांना दोष देण्यात अर्थ नाही कारण एक तर इतिहासाच्या तत्वज्ञानावर मराठी भाषेत अगदी नगण्य वाङ्मय उपलब्ध आहे. आणि जे आहे ते वाचावे असे वाटण्यासारखी शिक्षकांना परिस्थितीही उपलब्ध नाही. आज यशवंतराव चव्हाण स्मृती व्याख्यानमालेत या निमित्ताने या विषयावर विचार मांडण्याची मला संधी मिळते आहे त्यामुळे आनंद होतो. आजचे भाषण थोडे लांबले तरी हरकत नाही. एवढ्या लांब पुनःपुन्हा येणे होत नाही आणि आपली ही भरगच्च उपस्थिती आणि ऐकण्याची इच्छा लक्षात घेऊन शक्य तो या विषयाचा सूत्ररूपाने उलगडा होईपर्यंत मी बोलेन. या विषयाचा मूळ प्रश्न इतिहास लेखन कसे होते ? या प्रश्नापासून आपण सुरुवात करू आणि त्या अनुषंगाने पुढील चर्चा करू.

इतिहासाचा धापर

विदेशी इतिहासकारांपैकी इ. एच. कार, टॉयनबी आणि विल ड्युरांट हा जसा माझ्या आदराचा विषय आहे तसाच मराठी इतिहासकारांपैकी प्रसिद्ध इतिहास संशोधक त्र्यंबक शंकर शेजवलकर आणि इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे

सारे जीवन, त्यांची या क्षेत्रातील तपश्चर्या आणि त्यांनी केलेले इतिहास लेखन हा सुद्धा माझ्या आदराचा विषय आहे. त्यांचे स्मरण केल्याशिवाय या विषयावर बोलताच येणार नाही.

आपण इतिहास लेखन कसे होते ? या कूट प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा आज प्रयत्न करणार आहोत. तत्पूर्वी या इतिहासाच्या वापरासंबंधी शेजवलकर काय म्हणतात ते बघू. इ. स. १९४० साली शेजवलकर म्हणाले होते " महाराष्ट्राला एक जबरदस्त भूत, एक फार मोठा समंध बाधत आहे. त्याचे नाव इतिहास " शेजवलकर इतिहासाबद्दल जेव्हा असे म्हणतात त्यावेळी त्यांच्यासमोर महाराष्ट्राची आणि जागतिक तत्कालीन परिस्थिती होती. ' इतिहास माणसाला शहाणा करतो ' हा बेकनचा विचार होता. परंतु त्या काळातले वास्तवही भीषण होते. आपआपल्या इतिहासाचा वारसा सांगणारांनी आणि त्याचा अवाजवी अभिमान धरणारांनी जी कृत्ये आरंभिली होती त्यामुळे बेकनचा हा विचार व्यवहारात उलट झालेला दिसत होता. इतिहासाने माणसाला शहाणे बनविण्याऐवजी, त्याला शहाणपण देण्याऐवजी तो माणसांना पागल बनवितांना शेजवलकर प्रत्यक्ष बघत होते. जगातील अनेक आपत्ती आणि अनर्थ इतिहासातून निर्माण होतांना दिसत होते. यहुद्यांना इतिहास नसता तर त्यांची विटंबना, शतकानुशतके त्यांचा होत असलेला छळ थांबला असता. हिटलर सारख्या मानवतेला काळीमा फासणाऱ्या महा क्रूरकर्म्याच्या उदयाचे एक कारण मुळातच खुडले गेले असते. त्याच प्रमाणे महाराष्ट्राला इतिहास नसता तर म. गांधीजींच्या विरुद्ध जी अढी महाराष्ट्रात दिसली आणि आजही दिसते ती मुळातच धरली गेली नसती. त्यांच्या विरुद्ध जी धुळवड उडाली ती उडाली नसती असे शेजवलकरांचे मत होते. शेजवलकरांनी आपले हे मत गांधीजींच्या एका कडव्या हिन्दुत्ववादी राष्ट्रवाद्याकडून झालेल्या खुनापूर्वी आठ वर्षे अगोदर नोंदवून ठेवलेले आहे यात त्यांचे द्रष्टेपण दिसते. शेजवलकर आपल्या व्यासंगाने आणि संशोधनाने मराठीतील इतिहासाचे दालन समृद्ध करणारे एक इतिहास संशोधक आहेत. संपूर्ण आयुष्यात दारिद्र्याशी संघर्ष करून त्यांनी आपले संशोधन केले परंतु असा हा संशोधक जेव्हा " सर्व जगाचा, सर्व राष्ट्रांचा, सर्व लोकांचा इतिहास एकसमयावच्छेदेकरून भस्मसात होईल तर जगातील सर्व आपत्ती मुळातच नष्ट होतील. युद्धाची आद्य कारणे दबून जातील. समाज सुधारकांचा मार्ग, विश्व- कुटुंब- वाद्यांचा मार्ग, नवयुग सुरू करू पाहणारांचा मार्ग निष्कंटक खुला होईल " असे म्हणतात आणि आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण इतिहास संशोधनांत आणि लेखनात वेचतात त्यावेळी सामान्य माणसाला भांबावल्यासारखे होते. अशा प्रकारे इतिहास जाळून टाकणे खरोखरच कोणाला शक्य आहे काय ? परंतु ते शक्य झाले तरी ते योग्य आहे काय ? हा खरा

विचार करण्यासारखा प्रश्न आहे. खुद्द शेजवलकरांनाही ते मान्य नव्हते याची साक्ष त्यांच्या ऐतिहासिक संशोधनाचा आयुष्यभर चाललेला खटाटोपच आपल्याला देतो.

जगाचा इतिहास भस्मसात झाला तर विश्व कुटुंब स्थापन होईल हे निर्भीडपणे सांगणारे शेजवलकर इतिहासातील ' निजाम - पेशवे ' संबंध कसे होते, ' पानीपत ' वर काय झाले हे सांगतात आणि ' छ. शिवाजीच्या संकल्पित चरित्रा' साठी एवढी प्रचंड ऐतिहासिक साधन सामग्री जमवून त्याला एक दीर्घ प्रस्तावना लिहितात. हा सारा खटाटोप ते मग कशासाठी करतात ? या प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजे शेजवलकर इतिहासाकडे कोणत्या दृष्टीने पहात होते याची चर्चा करणे होय. परंतु ही चर्चा करताना शेजवलकर आणि त्यांचे समकालीन इतिहासकार कोणत्या सामाजिक वातावरणात इतिहास लिहीत होते याचाही विचार करावा लागेल.

ज्या कालखंडात मराठीत शेजवलकर आणि राजवाडे यांच्यासारखे इतिहासकार इतिहास लिहीत होते तो कालखंड महाराष्ट्राच्या समाज जीवनातील ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाच्या संघर्षाचा कालखंड होता. या वादाचा परिणाम तत्कालीन लेखनावर झालेला आहे. हे त्या काळातील प्रमुख इतिहासकारांच्या लेखनातून स्पष्ट होते. या वादाबरोबरच स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व कोणती जमात करणार आणि स्वातंत्र्योत्तर भारताचे नेतृत्व कोणत्या जमातीच्या हातात राहणार हे त्या काळातील ज्वलंत प्रश्न होते. या गोष्टी स्पष्ट करणारी अनेक उदाहरणे आपल्याला तत्कालीन लेखनात सापडू शकतात. स्वतः शेजवलकरांनी रियासतकार सरदेसाई यांच्या ' नानासाहेब पेशवे ' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत, एक इतिहास संशोधक शेजवलकरांना काय म्हणत होते ते लिहून ठेवले आहे. ते शेजवलकरांना म्हणाले होते ' अहो, पेशव्याबद्दल लिहितांना आपणास जरा जपूनच लिहिले पाहिजे, नाहीतर हे ब्राह्मणेतर आपल्याच वाक्यांचा आहेर आपणास करावयाचे व त्यांचा ब्राह्मणाविरुद्ध उपयोग करून घ्यावयाचे. ' म्हणजे हे इतिहास संशोधक पेशव्यांच्याबद्दल काय लिहायचे आणि काय लिहायचे नाही याबद्दलचा आपला दृष्टीकोन सांगत होते. इतिहास कसे लिहिले जात होते हे यावरून स्पष्ट होते. यासंबधीचे दुसरे उदाहरण तर फारच मजेशीर आहे, आणि ते उघडपणे जाहिरातीच्याच स्वरूपात सांगितले आहे. मी समर्थ रामदासावर जे लिहिलेले आहे. त्यात एक प्रश्न असा उपस्थित केलेला आहे की, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला रामदासांवरच एवढे लिखाण का झाले ? त्याचे उत्तर मी विस्ताराने दिलेले आहे. परंतु रामदास फार मोठे संत होते, त्यांनी कर्मयोग शिकविला, लोकजागृती केली, या गोष्टी या लेखनाच्या मागे गौण होत्या तर रामदास हे शिवाजीचे गुरु कसे होते. त्यांच्या आशिर्वादाशिवाय शिवाजीला राज्यच

स्थापता येणे कसे अशक्य होते आणि मराठा बहुजन समाजाला ब्राह्मणाचे नेतृत्व असल्याशिवाय कर्तृत्वच कसे गाजविता येणार नाही हे महाराष्ट्राच्या बहुजन समाजावर बिंबवायचे होते आणि स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व ब्राह्मणाकडेच कसे राहील यासाठी वातावरण निर्माण करायचे होते. " महाराष्ट्र भाषा चित्र मयूर " कृष्णाजी नारायण आठल्ये यांनी ' समर्थांचे सामर्थ्य किंवा श्री रामदासस्वामींचा लीलानुग्रह ' नांवाचे एक पुस्तक लिहिलेले आहे. अशा या ग्रंथाची जाहिरात केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर, ठाकुरद्वार मुंबअी यांनी श्री. मोरो केशव दामले यांच्या ' शास्त्रीय मराठी व्याकरणाच्या' दुसऱ्या आवृत्तीत १९२५ साली प्रसिद्ध केली आहे ही जाहिरातच महाराष्ट्रातील सुशिक्षित इतिहासाकडे कोणत्या दृष्टीने बघत होते व त्यामागे त्यांची मनोवृत्ती कोणती होती यावर पुरेसा प्रकाश पाडते. ती जाहिरात अशी आहे " भक्ती, मुक्ती, युक्ति आणि विरक्ती हा चतुर्बीज मंत्रात्मक ग्रंथ आम्ही मुद्दाम श्री आठल्ये यांच्या कडून लिहविला आहे. इतके सांगितले म्हणजे त्यातील भाषा व विचार कसे आहेत हे निराळे सांगण्याची गरजच नाही. " अशी सुरुवात करून या ग्रंथात काय काय आहे हे सांगितले आहे व या ग्रंथाचे वैशिष्ट्य सांगताना जाहिरात म्हणते "आणखी सर्वात विशेष हे की, या चरित्राचा हल्लीच्या ' स्वराज्य ' जागृतीच्या कामी कसा उपयोग करून घेता येण्याजोगा आहे आणि त्यात विशेषेकरून ब्राह्मणांनीच पुढारी होऊन आपण समर्थ कसे बनावे ही तर शेवटची गुरुकिल्ली आहे. ह्यामुळे हा ग्रंथ सर्वांग–सुंदर झाला आहे. "

यासारखी अनेक उदाहरणे देता येतील परंतु ही दोनच उदाहरणे ब्राह्मण ब्राह्मणेतरातील अंतर्विरोध स्पष्ट करण्यासाठी पुरेशी आहेत. त्याच बरोबर इतिहासाचा उपयोग जातीय अहंकार जतन करण्यासाठी व जातीय पुढारीपण निर्माण करण्यासाठी कसा केला जात होता याचीही कल्पना येते. या प्रवृत्तीमुळेच ' महाराष्ट्राच्या इतिहासाची झालेली आबाळ ' शेजवलकरांना अस्वस्थ करीत होती. ते म्हणतात, " महाराष्ट्रातील ब्राह्मण मराठ्यामध्ये जे कायम तट पडले आहेत व त्याचे सर्वनाशक दुष्परिणाम परवाच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत पदोपदी स्पष्ट झाले त्याचे एक बौद्धिक कारण महाराष्ट्रेतिहासाबद्दल निश्चित मते उघडपणे सांगण्यात आजवर ब्राह्मणांकडून अक्षम्य टाळाटाळ झालेली आहे हे होय. संशोधक ब्राह्मण, इतिहास लेखक व विवेचक ब्राह्मण, विषय ब्राह्मणांच्या अभि–मानाच्या राज्याचा, संपादक ब्राह्मण, शिक्षक ब्राह्मण, व्याख्याते ब्राह्मण, चळवळी त्यांनीच काढलेल्या आणि या सर्वांचे श्रोते, अनुयायी वाचक ते ही ब्राह्मण, यात क्वचित कोठे अपवादात्मक ब्राह्मणेतर असेल. या सर्व बनावाचा दुष्परिणाम असा की, ब्राह्मणांची कर्तबगारी अगदी गागाभट्ट रामदासापासून आरंभ करून तो ' अप्रबुद्ध ' गोळवलकर यांच्यापर्यंत अशा तऱ्हेने फुगविण्यात, सोज्वळ करण्यात

चुकीची व म्हणूनच खोटी करून सांगण्यात शक्य तेवढी जास्त कोशीस करण्यात आली आहे. याचा दुष्परिणाम मुख्यतः ब्राह्मणावरच जास्त वाईट तऱ्हेचा झालेला आहे" शेजवलकरांचे हे शब्द जरा जास्त कडक असले तरी ते वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत. त्यात त्यावेळी अवास्तव काहीच नव्हते. आज परिस्थिती झपाट्याने बदलत आहे हे खरे. परंतु शेजवलकरांच्या या कडक शब्दांच्यामागे खोट्या जातीय अहंकारातून निर्माण झालेल्या क्रौर्याची जी सामान्य माणसे बळी ठरली आणि ठरत आहेत त्यांच्याबद्दलची कणव आहे. मग ती ब्राह्मण असोत की मराठा, शीख असोत की हिंदू, मुस्लीम असोत की हरीजन, बळी जातात ती सामान्य माणसेच. हे जातीच्या कोषात ज्यांची मानसिकता अडकली आहे त्याना समजणे कठीण आहे.

गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्रात पुन्हा जातीय तणाव निर्माण होत आहेत याचे कारण समाजात विविध तट पडलेले आहेत. शेजवलकरांच्या काळातही ते होते. त्याची कारणमीमांसा सांगताना शेजवलकर प्रामाणिकपणे आपल्याला सांगतात की ' याचे कारण महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दलची निश्चित मते उघडपणें सांगण्यात इतिहास लेखन करणाऱ्यांनी अक्षम्य टाळाटाळ केलेली आहे हे आहे. ' म्हणूनच शेजवलकर-पूर्व आणि शेजवलकर-समकालीनाकडून जो इतिहास लिहिला गेलेला आहे तो तपासला पाहिजे. बहुजन समाजातील तरुण सुशिक्षित मुले राज-कारणात अडकलेली आहेत. त्यांना आमदार, खासदार, मंत्री होण्याची स्वप्ने पडत असतात. निदान जिल्हापरिषद किंवा तालुका पंचायत तरी हातात यावी हेच त्यांचे सर्वस्व बनले आहे. उरलेल्या मंडळींनी तर हातात टेंभे नाहीतर तलवारी घेऊन हिंदू राज्य स्थापण्याची पहिली पायरी म्हणून गोरगरीब दलित जनतेच्या झोपड्या जाळणे सुरू केले आहे आणि पुढची पायरी जास्तीत जास्त मुस्लीमद्वेष कसा फैलावेल यासाठी ते जिवाचे रान करीत आहेत. हा तर इतिहासाचा क्रम आहे. त्यांनी लगेच गीतेवर भाष्य करावे किंवा ब्रह्मचर्चा करावी असे मी म्हणत नाही. ते तर ती तशी करूही शकणार नाहीत कारण त्यांनी अद्याप बौद्धिक दास्य झुगार-लेले नाही. माणसाला त्याच्या शक्तीचा त्याचवेळी राष्ट्रनिर्मितीसाठी उपयोग करता येणे शक्य असते ज्यावेळी तो बौद्धिक दृष्ट्या स्वतंत्र होतो. हे परंपरेने आलेले बौद्धिक दास्य एकदम नष्ट होईल असे मी मानीत नाही. परंतु त्यासाठी गंभीरपणे प्रयत्न होत नाहीत एवढीच माझी तक्रार आहे. या तरुणांच्या शक्तीचा विध्वंसक गोष्टीसाठी आणि मोजक्या मंडळींचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी उपयोग होत आहे हे स्पष्ट दिसूनही याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे एक आख्खी पिढी उध्वस्त करणे आहे. मग हा इतिहास कोण तपासणार? ते एकट्या दुकट्याचे काम नाही. त्याला सांघिक प्रयत्न करावे लागतील. एक टीम तयार करावी लागेल. कधी तरी स्वतःच्या जीवनाचा, आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचा आणि राष्ट्राचा

अंतर्मुख होऊन विचार करावा लागेल. याकडे लक्ष द्यावे लागेल. शेजवलकर - पूर्व आणि शेजवलकर - समकालीन यांनी कोणत्या दृष्टीकोणातून इतिहास लेखन केले, ऐतिहासिक सत्य शोधण्यासाठी कोणती दृष्टी वापरली हे नीट समजावून घेतल्या-शिवाय शेजवलकरांच्या म्हणण्यातील सत्यासत्यता कळणे कठीण आहे.

राजवाडे आणि शेजवलकर

महाराष्ट्रात इतिहास लेखन करणारे इतिहासाचार्य राजवाडे हे शेजवल-करांच्या समकालीन होते. मराठी भाषेत इतिहास लेखनाचे एक नवे युग खऱ्या अर्थाने राजवाडे यांनीच सुरू केले. त्यांनी इतिहासाला दैवी शक्तीच्या आणि गूढ-वादाच्या आवर्तातून बाहेर काढले आणि इतिहासलेखनाला विज्ञाननिष्ठ दृष्टी देण्याचा प्रयत्न केला. शेजवलकरांच्या लिखाणातही याच बाबी प्रकर्षाने जाणवतात परंतु तरीही त्यांच्या ऐतिहासिक लिखाणात एकवाक्यता नाही. अनेक प्रसंगी तर ते परस्परविरुद्ध टोकालाही जाताना दिसतात. असे का व्हावे हा इतिहासाची आवड असणाऱ्या वाचकापुढील खरा प्रश्न आहे. यासाठी ते इतिहासाकडे कोणत्या दृष्टी-कोणातून बघत होते हे समजावून घ्यावे लागेल.

' ज्या राष्ट्रास भूतकाळ नाही त्याला भविष्यकाळही नाही ' अशी इतिहास-कारात एक समजूत होती. अद्यापही ती काही प्रमाणात आहे. साऱ्या मूलतत्व-वाद्यांचे ही समजूत एक आकर्षक घोषवाक्य आहे. म्हणूनच आपआपला भूतकाळ किती भव्य आणि दिव्य आहे हे सांगण्यात त्यांची जीवघेणी चढाओढ चालू असते. इतिहासाबद्दलच्या या समजुतीचा फायदा राजकारणातील सत्तास्पर्धेत आणि समाज जीवनात इतरांना दडपून आपले वर्चस्व टिकविण्यात अनेक नेते मंडळी करीत होती आणि आजही करतांना आपण पहात आहोत. या समजुतीवर शेजवलकरांनी निकराचा हल्ला चढविला. ते इतिहासाबद्दलच्या या समजुतीला, सिद्धांताला ' अशुद्ध ' म्हणत असत. या समजुतीप्रमाणे बघितले तर भारतात मराठे, शीख, रजपूत वगैरे लोकांनी इतिहासात नाव गाजवले म्हणून त्यांनाच भविष्यकाळ उज्वल आहे असे मानावे लागेल व जगात रोमन, ग्रीक आणि फ्रेंच वगैरे लोकांच्या वंशजांचाच भावी इतिहास बनणार आहे, असे मानावे लागेल. जर्मनसुद्धा या समजुतीमुळे खोट्या अहंकारांनी ग्रासले होते आणि या दृष्टीनेच तेथे इतिहास लेखन होत होते व तसेच शिकविलेही जात होते. परंतु महायुद्धात जर्मनीचा निकाल लागला, ज्यांना इतिहास नाही असे समजले गेले त्या गुजराथी वाण्यात गांधीजींच्या सारखा जगद्वंद्य महापुरुष निर्माण झाला, अमेरिकेतील निग्रोत डचुबाथ व पुढे मार्टिन ल्युथर किंग जन्माला आले आणि मूठभर उंचीच्या जपान्यात टोगे निपजले. आज तर जपान अमेरिकेसारख्या सर्वात समृद्ध देशाशी जीवनाच्या सर्व क्षेत्रात

स्पर्धा करीत आहे. या साऱ्या घटना बघितल्यानंतर ' ज्यांना भूतकाळ नाही त्यांना भविष्यही नाही ' हा सिद्धांत फोल ठरलेला दिसतो. शेजवलकरांच्यामतें इतिहासाचा खरा उपयोग हा ' शहाणपण शिकणे ' हा आहे मागील चुका व दोष नेहमी डोळ्यापुढे बागवून ते दोष आपल्यातून जावेत, तशा चुका पुन्हा घडू नयेत याकडे लक्ष देणे आवश्यक आहे हे दोष नाहीसे करतांना आपल्या भूतकाळाची काळजी करण्याचे आपल्याला कारण नाही. तो चांगला असला तर उत्तमच, नसला तरी त्याचा भविष्यावर मोठासा परिणाम घडणार आहे असे नाही. इतके स्वच्छ आणि शास्त्रीय विवेचन शेजवलकर आपणास देतात. म्हणूनच ते इतिहासाकडे एक उपयुक्त कला म्हणून बघत नाहीत तर ते एक शास्त्र आहे अशी त्यांची इतिहासा-बद्दलची धारणा आहे.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी विद्यासेवक मासिकातील (वर्ष १ अंक ७) ' भारतीय इतिहासाची मूल तत्वे ' या लेखात इतिहासाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मताप्रमाणे ' इतिहास ' शब्दाचे दोन अर्थ आहेत. १) गतकाली होऊन गेलेली जी कृत्ये त्यांना इतिहास हे जसे नाव लावतात तसेच २) गतकाली होऊन गेलेल्या कृत्यांच्या परंपरित वर्णनालाही इतिहास हा शब्द लावतात. कृत्ये व त्यांची वर्णने या दोहोंचा वाचक एकच शब्द आहे. पैकी कृत्य परंपरा वाचक जो इतिहास शब्द तो येथे इष्ट समजावा. इतिहासाचो मूलतत्वे म्हणजे कृत्य परंपरेची मूल कारणे. मूल कारणे दोन प्रकारची, बाह्य व आंतर. मनुष्याच्या पिंडावर बाह्य सृष्टीचे आघात होतात. आघाताचे सातत्य होऊन मनोरचना बनते. सृष्टी ही मनोरचनेचे ऊर्फ स्वभावाचे बाह्य कारण होते आणि कृत्य रूपाने फलद्रुप होणारा स्वभाव कृत्याचे आंतरकारण ठरते. " राजवाड्यांची ही व्याख्या निश्चितच वैज्ञानिक आहे म्हणूनच राजवाडे ' केवळ मोठमोठ्या व्यक्तींच्याच चरित्राने समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाही. मोठ्या व्यक्ती समाजात थोड्या असल्यामुळे त्यांच्या इतिहासाला लहान व्यक्तींच्या म्हणजेच बहुजन समाजाच्या इतिहासाचा जोड द्यावा लागतो ' असे सांगतात. राजवाड्यांच्या मते निर्लेप व निरहंकारपणाने इतिहासाचा विचार करावयाला लागणे ही इतिहासाचे खरे स्वरूप जाणण्याच्या मार्गाला लागण्याची पहिली पायरी आहे. या मार्गाला लागण्याची दुसरी पायरी सर्व प्रकारचे अर्धवट ग्रह सोडून देणे ही होय. "

राजवाडे आपल्याला इतिहास म्हणजे " वर्तमान क्षणाच्या पाठीमागील गतकाळी पृथ्वीवरील नव्या व जुन्या दरोबस्त सर्व समाजाच्या सर्व तऱ्हांच्या उलाढालीची साद्यंत व विश्वसनीय हकीकत होय " असे सांगतात आणि असा इतिहास पृथ्वीवरील कोणत्याही भाषेत अद्याप लिहिला गेलेला नाही याची कबूलीही देतात. कारण या इतिहास लेखनात वैयक्तिक मते आणि स्वदेशाभि–

मोंनाचा दर्प बाजूला ठेवणे आवश्यक असते. तसा तो ठेवला जात नाही. अशी त्यांची तक्रार आहे. त्याच प्रमाणे राजवाडे ' मूल्यमापन ' हे सुद्धा इतिहासकाराचे उद्दिष्ट मानीत नाहीत. ते काम नीतीशास्त्राचे आहे असे मानतात. नीतीशास्त्र हे स्थल व कालसापेक्ष असल्यामुळे ते शाश्वत निकष देण्यास असमर्थ आहे असे त्यांचे मत होते. म्हणूनच ते म्हणतात " सूक्ष्मतेने पहाता निर्भेळ इतिहास म्हणून ज्याला म्हणता येईल त्याचे काम फक्त झालेल्या प्रसंगांची विश्वसनीय हकीकत देण्याची आहे. कालाचे पौर्वापर्य लावून व प्रसंगांचे कार्यकारत्व सिद्ध करून भूत गोष्टी अशा अशा सातत्याने घडल्या इतके सांगितले म्हणजे इतिहासाची कामगिरी आटोपली....इतिहास भूतवृत्ताचा विश्वसनीय सारांश देतो व नीतीशास्त्र त्याचे उत्तमाधमत्व ठरविते. निःपक्षपाताने काढलेला सारांश मात्र, यावच्चंद्रदिवाकरौ अजरामर राहतो. "

शेजवलकर आणि राजवाडे यांच्या विचारांचा मागोवा घेत आपण ही चर्चा सुरू केली कारण ते दोन्हीही आपल्याला परिचित आहेत म्हणून. मराठी भाषेत इतिहासलेखन करून त्यांनी या भाषेला समृद्ध करण्याचा आणि इतिहासाबद्दलचा विचार सामान्य मराठी माणसापर्यंत नेण्याचा परिश्रमपूर्वक जो प्रयत्न केला त्याची तुम्हाला विस्मृती होऊ नये म्हणून आणि तुमच्यात उद्या निर्माण होणाऱ्या इतिहासकारांना या नावांनी प्रेरणा मिळावी म्हणून. याचा अर्थ मराठीतील अन्य इतिहासकार कमी दर्जाचे आहेत हे सुचविण्याचा हेतु अजिबात नाही. त्या सर्वांनीच आपआपल्या परीने हे दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे याची नम्रपणाने कबूली दिली पाहिजे.

आपल्याकडे लेखकाची जात पाहण्याची एक प्रथा आहे. आपण तर प्रत्येकाच्याच जातीचा खुलासा करून घेतल्याशिवाय त्यासंबंधी मत बनवायला तयार नसतो. शेजवलकर आणि राजवाडे यांच्याही जाती शोधण्याचा प्रयत्न झालेला आहे. परंतु त्यांच्या जातींच्यापेक्षा त्यांचे दृष्टीकोण मला इतिहास विषयावरील चर्चा पुढे नेण्याच्या दृष्टीने अधिक मोलाचे वाटतात. आज जगात इतिहासाबद्दलची जी चर्चा वेगाने पुढे चालू आहे तिच्याशी सांधा जुळविण्यासाठी यांचे विचार उपयुक्त वाटतात. राजवाडे आणि शेजवलकरांच्या जाती भिन्न होत्या. त्याप्रमाणेच त्यांचे इतिहासाकडे बघण्याचे दृष्टीकोणही भिन्न होते. राजवाडे कोकणस्थ ब्राह्मण होते तर शेजवलकर कऱ्हाडे ब्राह्मण होते. ही तर वस्तुस्थिती होती. परंतु या जाती भिन्नतेमुळे त्यांच्या इतिहास विषयक दृष्टीकोणात फरक होता काय ? राजवाडे आणि शेजवलकर यांची मते पुढे ठेवून ती मते त्यांच्या जातीमुळे कशी बनली हे दाखविण्याचे प्रकारही आपल्याकडे झालेले आहेत. राजवाडे कोकणस्थ तर शेजवलकर कऱ्हाडे ब्राह्मण, राजवाडे म्हणत राज्य कोकणस्थांचे गेले आहे म्हणून ते परत

मिळविण्याचा प्रयत्न कोकणस्थांनाच करणे भाग आहे. शेजवलकर म्हणत राज्य कोकणस्थांनी घालविले आहे म्हणून या राज्य गमाविणाऱ्या कोकणस्थांचा ब्राह्मण-वाद ठोकून काढला पाहिजे. राजवाड्यांनी कऱ्हाड्याजवळ गोडबोलेपणा, साखर-पेरेपणा असतो असे म्हटले आहे तर शेजवलकरांनी कोकणस्थांजवळ पैसे मिळ-विण्यासाठी लाचारीचे सोंग आणण्याचा दांभिकपणा असतो असे सुचविले आहे. ही उदाहरणे अशी आहेत. राजवाडे आणि शेजवलकर मोठे इतिहासलेखक होते परंतु शेवटी तीही माणसेच होती. त्यांच्यात क्वचित प्रसंगी जातीय अभिनिवेश आलाच नसेल असे म्हणता येणार नाही. तसा तो अनेकदा आलेलाही आहे. परंतु आपल्याला या ठिकाणी त्या अभिनिवेशाची चर्चा करावयाची नाही तर त्यांच्या भिन्न इतिहास-विषयक दृष्टीकोणांची चर्चा करावयाची आहे.

इतिहासाचार्य राजवाडे जेव्हा " झालेल्या प्रसंगांची विश्वसनीय हकीकत निर्लेप व निरहंकारपणाने कोणतेही पूर्वग्रह न ठेवता देणे " यावर इतिहास लेखनात जोर देतात. त्यावेळी आपल्याला असे वाटते की, खरोखरच घडलेल्या घटना जशा घडलेल्या असतात तशाच त्या आपल्यासमोर इतिहास लेखनात याव्यात आणि त्या जशा घडलेल्या असतात तशाच सांगण्याचे काम पूर्वग्रहरहित इतिहासकारच करू शकतो आणि त्याचे मन निर्लेप आणि निरहंकार असेल तरच हे घडू शकते. प्रथम दर्शनी राजवाड्यांचे हे म्हणणे आपण लगेच मान्य करून टाकतो परंतु हे इतके सोपे नाही. राजवाडे यांच्या या विचारात अनेक गोष्टी संदेह निर्माण करणाऱ्या आहेत आणि त्यासाठी राजवाड्यांच्या या मतातील प्रत्येक शब्दाला आपण प्रश्न विचारू शकतो. त्या प्रश्नांची उत्तरे म्हणजेच इतिहास लेखन कसे होते या प्रश्नाचे उत्तर आहे. तर शेजवलकर " मी मराठ्यांचा इतिहास अभ्यासिला तो मुख्यतः मराठ्यांच्या सद्यःकालीन स्थितीचा यथार्थ बोध होण्यासाठी " असे म्हणतात. याचा अर्थ शेजवलकर इतिहासाचा, ऐतिहासिक घटनांचा, भूतकाळाचा सद्यःकालीन स्थिती समजावून घेण्याकरता, वर्तमान समजावून घेण्याकरता एक साधन म्हणून उपयोग करू इच्छितात हे स्पष्ट होते. परंतु शेजवलकर आपल्याला आणखीन एक महत्वाचा विचार सांगतात आणि तो म्हणजे " माणसाच्या कृतीपेक्षा त्यामागील तत्वज्ञानाची छाननी आम्ही जास्त कसोशीने करतो " याचा अर्थ इतिहासात जी एखादी कृती घडते ती तशी का घडली, तिच्यामागे कोणते तत्वज्ञान आहे हे समजावून घेण्यात शेजवलकरांना अधिक रस आहे. शेजवलकरांचे हे म्हणणेही आपल्यापैकी काही लोक मान्य करतील परंतु ते सुद्धा निर्विवाद नाही आहे. त्यातूनही अनेक प्रश्न उद्भवतात आणि त्यांचीही उत्तरे शोधावी लागतील. परंतु त्याच बरोबर आपण स्वतः लिहिलेला इतिहास हा खऱ्या निर्लेप आणि निरहंकारी मनाने लिहिलेला आहे असा शेजवलकरांचा दावा आहे. शेजवलकर लिहितात " अनेक चित्पावनांचे आमच्याबद्दल काय मत आहे हे आम्ही नानासाहेब पेशव्यांच्या चरित्राला प्रस्तावना

लिहिल्यापासून पुढे आलेलेच आहे. खरे पाहू जाता आमची भूमिका खऱ्या इतिहासकाराची असल्यामुळे आम्ही प्रत्येक बाबतीत निर्भय, निरहंकार असतो. 'रात्रौ मित्रे पुत्रे बंधी मा कुरु यत्नं विग्रहसंधौ । भव समचित्त सर्वत्र त्वम् ।' अशी दृष्टी आम्ही ठेविली आहे. आमच्या समोर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला किंवा गोष्टीला तिचे यथायोग्य स्थान मिळवून देणे एवढेच आमचे काम आहे. असे करितांना अनेकांच्या दृढ समजुतींना धक्का देण्याची पाळी आमच्यावर येते, अनेकांच्या अभिमानाला झोंबणाऱ्या गोष्टी आम्हास पुढे मांडाव्या लागतात त्याला आम्ही काय करणार ? इतिहासकाराचे कर्तव्य असेच अत्यंत खडतर व कडू आहे" शेजवलकरांचे हे आत्मनिवेदन किती प्रामाणिक होते हे त्यांचे जीवन आणि त्यांचे लेखन ज्यांनी पाहिले आहे त्यांना त्याबद्दल अधिक सांगण्याची गरज नाही.

वरील विवेचनावरून आता आपण इतिहास लेखनासंबंधी काही प्रश्न उभे करू शकतो. यापैकी पहिला प्रश्न असा आहे की, वर्तमानक्षणाच्या पाठीमागील गतकाली पृथ्वीवर अस्तित्वात असणाऱ्या सर्व जुन्या आणि नव्या समाजाच्या सर्व तऱ्हांच्या उलाढालीची साद्यंत आणि विश्वसनीय हकीकत इतिहास लेखनात समाविष्ट करता येणे शक्य आहे का ? जर शक्य असेल तर तशा प्रकारचा इतिहास का लिहिला गेला नाही आणि शक्य नसेल तर इतिहास लेखनात ते का शक्य होत नाही. ? दुसरा प्रश्न असा विचारता येईल तो असा की, घडलेल्या घटनांची हकीकत खरोखरच विश्वसनीय असते का ? ती कोणाच्या दृष्टीने विश्वसनीय ? इतिहासकाराच्या की इतिहास वाचकाच्या ? इतिहासकाराचे मन खरोखरच निर्लेप आणि निरहंकारी, पूर्वग्रहरहीत असे कोऱ्या पाटीसारखे असू शकते काय ? तिसरा प्रश्न इतिहास खरोखरच वर्तमानकाळ समजावून घेण्यासाठी लिहावयाचा असतो काय ? तसे केले तर ज्या ऐतिहासिक घटना इतिहास लेखनात येतील त्या विश्वसनीय असू शकतील का ? की त्यांच्यावर वर्तमानकाळाचे संस्कार झालेले असतील. चौथा प्रश्न इतिहासकाराने घडलेल्या घटनासंबंधी त्या मागील तत्वज्ञान पाहणे योग्य आहे काय ? म्हणजेच ऐतिहासिक घटनांचे मूल्यमापन करून आपला दृष्टीकोन मांडणे योग्य आहे का ? पाचवा प्रश्न इतिहास लेखनात नीतीतत्वाचे नेमके स्थान काय ? सहावा प्रश्न भूतकाळातील घटना कशा क्रमाने घडल्या हें सांगताना जे कालाचे पौर्वापर्य लावायचे व प्रसंगांचे कार्यकारणत्व सिद्ध करावयाचे असते ते कोणतीही तात्विक भूमिका न घेता शक्य आहे काय ? आणि सातवा प्रश्न इतिहास जर एक विज्ञान असेल तर त्याचे स्वरूप कसे आहे ? या सारखे प्रश्न आणखीही काही उपस्थित करता येतील परंतु त्याची आवश्यकता नाही. ते विवेचनाच्या ओघात आपोआपच निर्माण होतील. या ठिकाणी या सर्वच प्रश्नांची उत्तरे आपण शोधणार नाही. इतिहास लखन कसे होते एवढ्या प्रश्नाच्या मर्यादेतच आपण ही चर्चा करू.

वास्तव घटना आणि ऐतिहासिक घटना

राजवाडे यांच्या इतिहास विषयक दृष्टीचा विचार करतांना व्हाल्टेअर, रांके आणि ऑगष्ट कोम्ट यांच्या दृष्टीशी ती बरीच मिळती जुळती होती असे त्यांच्या लेखनाच्या काही अभ्यासकांचे मत आहे. या मताची यथार्थता तपासण्यासाठी एकोणिसाव्या व विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात जागतिक पातळीवर इतिहासाच्या तत्व मीमांसेचा विचार कसा विकसित होत होता हे पाहणे उपयुक्त ठरेल. या मीमांसेच्या विकासाचा तपशील इ. एच. कार यांनी आपल्या इतिहास म्हणजे काय ? व्हाट इज हिस्टरी ? या पुस्तकात अतिशय सूत्रबद्धरीतीने आणि ओघवत्या भाषेत दिलेला आहे.

राजवाडे ज्याला 'झालेल्या प्रसंगाची विश्वसनीय हकीकत निर्लेप व निरहंकारपणाने कोणतेही पूर्वग्रह न ठेवता देणे' असे म्हणतात त्यालाच तो प्रसंग घडतांना ज्या वास्तव घटना इतिहासामध्ये घडल्या, त्या जशा घडल्या तशाच सांगणे असे म्हणता येईल. आजही सामान्य माणसे 'पण फॅक्ट काय होती' असे विचारतात. इतिहासलेखनाच्या दृष्टीने एकोणिसावे शतक हे फॅक्टस्चे, वास्तव घटनांचे शतक मानले जात होते. 'जीवनात फक्त वास्तव घटनाच हव्या असतात' असे जेंव्हा ग्रॅडग्रींड म्हणत असत. त्यावेळी त्यांना घटना जशा घडतात तशाच हव्या होत्या. आणि सारे इतिहासलेखक या घटना शोधण्यात गर्क झाले. इतिहास लेखनात एक नवा विचार आला. एक नवी लाट निर्माण झाली. इतिहास वाचतांनाही माणसे 'खरे काय आहे ?' याचा चौकसपद्धतीने विचार करू लागली. फॅक्टस्चे आकर्षण वाढले. परंतु हे घडण्याला कारणही तसेच होते. या काळात इतिहासाला नीतीच्या आसऱ्याने उभे करण्याचे जोरकस प्रयत्न चाललेले होते. या नीतीच्या दास्यातून इतिहासाला मुक्त करण्याची चळवळ म्हणजेच इतिहासात वास्तव घटनांच्या शोधाची सुरुवात आहे. ही इतिहासाला नीतीशास्त्राने बद्ध केल्याविरुद्धची प्रतिक्रिया होती. प्रसिद्ध इतिहासकार लिओपोल्ड रांके हा या प्रतिक्रियेतील अग्रणी लेखक होता. 'अमूक एक घटना खरोखर कशी होती' केवळ एवढे नोंदविणे हेच इतिहासकाराचे एकमेव कर्तव्य आहे. हेंच त्याचे इतिहास लेखनासंबंधी आग्रही प्रतिपादन होते. हा त्याचा विचार इतिहासलेखकांचा मंत्रवाक्य झाला. जर्मन, फ्रेंच आणि ब्रिटीश इतिहासकारांच्या जवळ जवळ तीन पिढ्या इतिहासलेखन करतांना रांकेने दिलेला हा मंत्र घोकीत होत्या. आपले राजवाडे सुध्दा म्हणूनच 'मूल्यमापन' हे इतिहासाचे काम नाहीच तर ते नीतीशास्त्राचे आहे आणि नीतीशास्त्र आणि इतिहास यांचा संबंधच तोडला पाहिजे हे सांगता सांगताच नीतीशास्त्राच्या मर्यादांच्याकडेही बोट दाखवितांना दिसतात.

एकोणीसाव्या शतकात इतिहासलेखनात वास्तव घटनांची ही जी टूम निघाली होती, कल्ट ऑफ फॅक्टस्‌ने जो प्रभाव निर्माण केला होता त्यातून एक महत्वाची गोष्ट घडलेली आहे. या टूमीनेच इतिहासाला विज्ञानाचा दर्जा प्राप्त करून देण्यात मोलाचे योगदान केलेले आहे. एक स्वतंत्र शास्त्र म्हणून समाजविज्ञानात इतिहा-साला उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कामी त्या काळात लेखन करणाऱ्या प्रत्यक्ष ज्ञानवादी, पॉझिटीवीस्टस् मंडळींचा पुढाकार होता. या प्रत्यक्षज्ञानवाद्यांनी इतिहास लेखनाचे एक सूत्र दिले. त्यांचे सूत्र असे होते की, पहिल्यांदा इतिहासात प्रत्यक्ष घडलेल्या घटना निश्चित करा आणि या घटनांच्या अनुषंगाने निष्कर्ष काढा. ब्रिटनमध्ये इतिहासाच्या या सूत्राचे मोठ्या प्रमाणावर स्वागत होणे साहजिक होते. कारण इतिहासासंबंधीचे हे सूत्र जॉन लॉक यांच्यापासून तो बट्रॉन्ड रसेल यांच्या-पर्यंतच्या अनुभववादी परंपरेत ते चपखल बसणारे होते. त्यामुळे आता या अनुभववादासंबंधी थोडी माहिती बघितली पाहिजे. ज्याला आपण अनुभववादी ज्ञानसिद्धांत किंवा इंपिरिकल थिअरी ऑफ नॉलेज म्हणतो त्याच्यात ज्ञाता म्हणजे सब्जेक्ट आणि ज्ञेय म्हणजे ऑब्जेक्ट यांच्यातील पूर्ण फारकत गृहीत धरलेली असते. ज्ञान मिळवू इच्छिणारा आणि ज्याचे ज्ञान करून घ्यावयाचे ते जे काही असेल त्यात पूर्ण फारकत गृहीत धरलेली असते. तसे केले नाही तर ' वस्तुस्थितीचा निरीक्षकाच्या जाणीवेशी कोणताही संबंध नसतो ' हे अनुभववादाचे मुख्य सूत्र स्वीकारताच येणार नाही. वस्तुस्थिती पूर्णपणे स्वतंत्र असते असा अनुभववादाचा दावा आहे. निरीक्षक अगदी निर्विकारपणे वस्तुस्थिती गोळा करतो, आणि नंतर तिची व्यवस्थित मांडणी करतो. इतिहासासंबंधीचा हा सामान्य दृष्टीकोण आहे. याचाच अर्थ इतिहास हा घडलेल्या घटनांचा संग्रह असतो. या घटना इतिहास-काराला विविध कागदपत्रावरून, शिलालेखावरून अथवा अन्य साधनावरून उपलब्ध होऊ शकतात. इतिहासकाराचे काम त्या घटना एकत्रित करणे आणि त्यांची व्यवस्थित मांडणी करणे हे आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांचे जे विचार आपण पाहिले त्यावरून रांकेचा त्यांच्यावर किती प्रभाव होता हे स्पष्ट होऊ शकते.

' इतिहास म्हणजे घडलेल्या घटनांची विश्वसनीय हकीकत ' असे जेव्हा मानले जाते त्यावेळी आपण असा प्रश्न विचारू शकतो की, इतिहास लेखनात ज्या घटना समाविष्ट झालेल्या आहेत त्या व्यतिरिक्त त्यासमकाली आणखी काही घटना घडल्याच नव्हत्या का? जर त्या घडल्या असतील तर इतिहास लेखनात समाविष्ट झालेल्या घटनाच का निवडल्या आणि बाकीच्यांच्याकडे दुर्लक्ष का झाले? वस्तुस्थिती अशी आहे की, गतकाळ हा अनंत घटनांनी विणलेला असतो. या सर्वच घटनांची कोणालाच केव्हाच नोंद करता आलेली नाही. आपण छत्रपती शिवाजींचे यादृष्टीने उदाहरण घेऊ शकतो. छत्रपती जन्मल्यापासून तो त्यांचा मृत्यु होईपर्यंत

जो काळ लोटला त्या काळात स्वतः छत्रपतींच्या जीवनात आणि ते ज्या विभागात वावरले त्या विभागात अनंत घटना घडलेल्या असतील. शिवाजीवर लिहिला गेलेला कोणताही इतिहास आपण वाचून पाहिला तर या सर्वच घटनांच्या नोंदी आपल्याला सापडू शकतील काय ? तसे केले असते तर शिवरायांचे सारे किल्ले घटना नोंद–विलेल्या कागदांच्या दप्तरांनीच भरावे लागले असते. शिवरायांचा जो भला बुरा इतिहास इतिहासकारांनी लिहून ठेवला आहे, त्यात छत्रपतींच्या समकालीन अन्य घटना तर सोडाच परंतु खुद्द त्यांच्या जीवनातील प्रत्येक घटनेची नोंद झालेली आहे असा इतिहास कोणी लिहिलेला आहे काय ? शेजवलकरांनी तसा प्रयत्न केलेला दिसतो. शिवाजीच्या कोणत्याही चरित्र लेखकाने जे काम केले नाही ते शेजवलकरांनी करण्याचा प्रयत्न केला. शिवाजीच्या एकूण आयुष्याचा तपशील त्यांनी शोधण्याचा प्रयत्न केला. शिवाजीचे एकूण आयुष्य १८३०६ दिवसांचे होते हे शेजवलकर सांगतात. परंतु या दिवसांचा तासवार तपशील कोणाला देता येईल काय ? या काळातही अनेक घटना घडून गेल्या असण्याची शक्यता आहे. शेजवलकर फारच झाले तर शिवाजी प्रत्यक्ष युद्धभूमीवर किती दिवस होता आणि किती लढाया त्याच्या नावावर चालल्या होत्या, अगदीच खोलात शिरायचे ठरलें तरी ' रायगडावरून बसरुरच्या स्वारीस शिवाजी जेव्हा निघाला त्यावेळी सोयराबाईला ऋतु प्राप्त झाला. म्हणून समागमे शिवाजीने स्त्रीची पालखी घेतली. मालवण सिंधूदुर्गपावेतो त्याने पत्नीं सह बाळगली व मग परत पाठवून दिली ' इथपर्यंतचे तपशील शेंजवलकर देवू शकतात परंतु शिवरायाच्या प्रत्येक क्षणाचा तपशील कोणालाही देता येणे शक्य नाही. आज एखाद्याला छत्रपतींचे नव्याने ऐतिहासिक चरित्र लिहावयाचे असले तरी हा लेखक इतिहासाची जी जी माहिती मिळवील तीं सर्वच काही तो या नव्या इतिहासात समाविष्ट करू शकणार नाही. त्यापैकी त्याला जी माहिती योग्य वाटेल तिचाच तो उपयोग करील. शिवाजीच्या जीवनात आणि त्याच्या अवती भवती असंख्य घटना घडलेल्या असतांनासुद्धा हा लेखक फक्त त्याला आवडलेल्या, योग्य वाटलेल्या निवडक घटनाच बाजूला काढील आणि त्यांची मांडणी करील. त्याला आपण इतिहास म्हणू आणि उद्याचे इतिहासकार याच लेखनाचा अभ्यास करून त्यांना हव्या तेवढ्याच घटना आपल्या लेखनात वापरतील. याचा सरळ अर्थ असा आहे की, गतेतिहासात ज्या अनंत घटना घडत असतात त्या सर्वांच्याच नोंदी काही इतिहास लेखनात होऊ शकत नाहीत. फार थोड्या घटनांच्या नोंदी इतिहास लेखनात इतिहासकार करीत असतो. त्याच्या दृष्टीने ज्या घटनांच्या नोंदी तो करतो त्या ऐतिहासिक घटना असतात व त्याच्या-कडून ज्या घटना वगळल्या जातात त्यांना ऐतिहासिक घटना मानले जात नाही इतिहासकार आपले इतिहास लेखन करतांना ज्या घटनांची निवड करीत असतो

तो त्या घटना घडलेल्या असतात म्हणून नव्हे, मग तशा तर ज्यांची नोंद नसते त्याही घडलेल्याच घटना असतात. तर त्या घटनांची नोंद करणे त्याला आवडले, योग्य वाटले म्हणून त्यांची नोंद त्याने केली. हा त्याच्या मर्जीचा भाग आहे. घडलेल्या असंख्य घटनापैकी कोणत्या घटनांना ऐतिहासिक घटनांचा दर्जा द्यायचा याचे सर्व स्वातंत्र्य इतिहासकाराला असते. म्हणूनच कार सारखे इतिहास मीमांसक 'वास्तव घटना स्वतःच बोलक्या असतात,' 'फॅक्टस् स्पीक देमसेल्वज्' हा इतिहास लेखनातील एक सवंग प्रकार असून तो खरा मानीत नाहीत. या उलट घटना त्याच वेळी बोलू शकतात ज्यावेळी इतिहासकार त्यांची इतिहासलेखनात ऐतिहासिक घटना म्हणून निवड करीत असतो. यासाठीच एकीकडे घटना बोलती करण्याचे इतिहासकारावर अवलंबून असते तर दुसरीकडे या घटनांना इतिहास–काराच्या स्पष्टीकरणाबाहेर वस्तुनिष्ठ, स्वतंत्र अस्तित्व असते या म्हणण्याला विसंगत युक्तिवाद, प्रीपॉश्चरस फॅलसी मानतात. हा विसंगत युक्तीवाद दूर करणे हे काही इतिहासकार समजतात तितके सोपे काम नाही.

याचा अर्थ असा आहे की, एकीकडे आपण इतिहासातील घटनांना स्वतंत्र अस्तित्व असते असे मानणार आणि दुसरीकडे त्या घटनांचे नशीब इतिहासकारावर सोपविणार. ही विसंगती तर खरीच. या विसंगतीतून एक मार्ग इतिहासकारांनी काढलेला दिसतो. तो असा आहे की, इतिहासात काहीं मूलभूत स्वरूपाच्या ऐति–हासिक घटना असतात असे त्यांनी गृहीत धरले. या ऐतिहासिक घटनांना सर्वच इतिहास कारांची मान्यता असते असे मानले. या ऐतिहासिक घटनांनाच इतिहासाचा कणा केले. त्याबाहेर इतिहासकारांनी विचारच करावयाचा नाही असे ठरविले. याचा परिणाम इतिहास लिहिणे, इतिहास शिकविणे आणि इतिहास शिकणे म्हणजे काय करणे तर इतिहासकारांनी एकमुखाने ज्या ऐतिहासिक घटनांना मान्यता दिलेली असते त्या पाठ करणे होय. इतिहासाबद्दलची ही कल्पना इतकी सर्वश्रुत झालेली आहे की, इतिहास हा विद्यार्थीवर्गात टिंगलीचा, कंटाळवाणा आणि रटाळ विषय बनलेला आहे. इतिहास शिकविणे म्हणजे काय करणे तर सनावळ्या पाठ करणे, लढाया कुठे झाल्या ती ठिकाणे आठवणे, एलिझाबेथ राण्या किती झाल्या, जेम्स नावाचे राजे किती झाले, शिवाजी राजे किती झाले ? त्यापैकी पहिल्याने काय केले, दुसऱ्याने, तिसऱ्याने काय केले. त्यांच्या वंशावळी कोणत्या ? त्यांच्या राण्यांची किंवा राजांची नावे काय ? आज शाळा कॉलेजातील क्रमिक पुस्तके पाहिली तर त्यात या माहितीच्या ओझ्यापलिकडे काय आहे ? हे माहितीचे ओझे परंपरेने वागवीत रहाण्यापलिकडे आपले इतिहासाचे शिक्षण गेलेले नाही त्याला या ओझ्यातून मुक्त करणे हे केवळ त्याच्याच विकासापुरते मर्यादित नाही तर इतिहास हा फक्त राजघराण्यांना नसतो तर तो साऱ्याच मनुष्यजातीला

असल्यामुळें आणि तो एकाच क्षेत्राला नसतो तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना असल्याने त्याची मुक्ती ही अंशतः सर्वच क्षेत्रांची मुक्ती आहे. एका व्यापक दृष्टीं-कोणाचा स्वीकार केल्याशिवाय ही मुक्ती अशक्य आहे. या मुक्तीकडे आपण लक्ष न दिल्यामुळे आणि इतिहासकारांनी आपले क्षेत्र मर्यादित केल्यामुळे आपल्या इतिहासात फालतू वाद सुरू झाले आहेत आणि या फालतू वादांनी अनेक पिढ्यांना अंधारात भटकायला लावले आहे. आपली मंडळी शिवाजीची जन्मतारीख कोणती? इ. स. १६२७ मधील की इ. स. १६३० मधील यावर उत्साहाने चर्चा करण्यात पटाईत आहेत. ज्ञानेश्वर एक की अनेक? रामदास शिवाजीचा गुरु होता का नाही? त्या दोघांची भेट राज्याभिषेकापूर्वीची की राज्याभिषेकानंतरची? या सारखे प्रश्न म्हणजेच इतिहास लेखनातील महत्वाचे प्रश्न मानून सारा अविचार चालू होता आणि अद्यापही तो चालू आहे. इतिहासाने यापेक्षा अधिक काही व्यापक विचार करावयाचा असतो याकडे आपले लक्षच जात नाही.

आपल्या इतिहासातील एखादे उदाहरण देवूनही हे अधिक स्पष्ट करता येईल. उदाहरणार्थ आपण प्लासीची लढाई इ. स. १७५७ साली झाली असे मानतो. या घटनेचे दोन प्रकारे स्पष्टीकरण करता येईल. पहिले म्हणजे इतिहासकाराच्या दृष्टीने प्लासीची लढाई इ. स. १७५७ साली झाली. ती इ. स. १७५८ साली किंवा १७५६ साली झालेली नाही. दुसरे ती प्लासींलाच झाली. ती रामेश्वर किंवा काशीला झालेली नाही. प्लासीची लढाई इ. स. १७५७ ला झाली आणि ती प्लासीलाच झाली हे सांगण्याचा काटेकोरपणा तर इतिहासकाराकडे असलाच पाहिजे. ते तर त्याचे आद्य कर्तव्य आहे. हा काटेंकोरपणा तर त्याच्या लेखनाची पूर्वअट आहे. परंतु त्याच्याठायी असलेला हा काटेकोरपणा पुरेसा नाही. केवळ तोच इतिहासकाराला श्रेष्ठत्व प्राप्त करून देत नाही. तसे झाले असते तर राजदर-बारातील लेखनिक आणि बखरकार यांनाच श्रेष्ठ इतिहासकार मानावे लागेल. एखादी ऐतिहासिक घटना अमूक एका ठिकाणी आणि अमूक एका वेळी घडली एवढे सांगितले म्हणजे इतिहासकाराचे काम संपत नाही. कारण ही घटना एक सुटी नसते. तिला अनेक पदर असतात. या साऱ्याच पदरांचे नसले तरी जितक्या जास्तीत जास्त पदरांची माहिती इतिहासकार आपणास देईल तितके त्याचे लिखाण अधिक काटेकोर आणि अधिक श्रेष्ठ दर्जाचे ठरेल. या घटनेच्या काटेकोर ज्ञानासाठी इतिहासकाराला इतिहासाला पूरक अशा इतर शास्त्रांचाही आधार घ्यावा लागतो. अशा शास्त्रात पुराणवस्तुशास्त्र- आर्कियालॉजी, लिपीशास्त्र- ऐपिग्राफी, नाणेशास्त्र न्यूमिस्मॅटीक्स, कालगणनाशास्त्र - क्रोनॉलॉजी या आणि यासारख्या इतर शास्त्रावर अवलंबून रहावे लागते. इतिहासकार या सर्व शास्त्रात तज्ञ असेल अशी अपेक्षा करणे बरोबर नाही. परंतु या शास्त्रातील अद्ययावत ज्ञानाशी त्याचा किमान परिचय

असला पाहिजे अशी अपेक्षा धरणे गैर नाही. कारण इतिहासकार ज्या ऐतिहासिक घटनांना म्हणजेच आपल्याकडे असलेल्या या कच्च्या मालाला घेऊन इतिहासाचे मंदिर उभारू इच्छितो त्या ऐतिहासिक घटनावर नवेनवे प्रकाश पाडण्याचे काम ही शास्त्रे करीत असतात.

इतिहासाचार्य राजवाडें यांनी " काल, स्थल व व्यक्ती या त्रयींची जी सांगड घातली जाते तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देता येते " असे म्हटलेले आहे. यात सामान्य प्रसंग आणि ऐतिहासिक प्रसंग यात काटेकोर भेद दिसत नाही. राजवाड्यांना तसा तो दिसणे शक्यही नव्हते. कारण त्यासंबंधीची चर्चाच मुळी त्यांच्या निधनानंतर सुरू झालेली आहे. एकतर साऱ्याच गतेतिहासातील घटनांना ऐतिहासिक घटनांचा दर्जा देणे कुणालाच शक्य नाही आणि ज्यांना इतिहासकार मुख्य ऐतिहासिक घटना मानतात आणि ज्यांना दुय्यम घटना मानतात त्यांचे स्थान सदैव अचल असते असे नाही. एखादी दुय्यम घटनाही ऐतिहासिक घटना बनू शकते आणि एखादी मान्यताप्राप्त बनलेली ऐतिहासिक घटना सुद्धा दुय्यम स्थानावर जाऊ शकते. हे महाराष्ट्राच्या एका अलि-कडील इतिहासातील ऐतिहासिक घटनेवरून समजावून घेता येते. इतिहासकारांना एखादी सामान्य वाटणारी घटना कालक्रमांत ऐतिहासिक घटना कशी होते हे समजावून घेणे अतिशय मनोरंजक आहे. परंतु ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही तर इतिहास लेखन ही एक सतत चालणारी प्रक्रिया कशी आहे यावरही प्रकाश टाकणारे आहे. उदाहरणार्थ दुसरा बाजीराव नाशिक क्षेत्री गेला असता तेथील गोदावरी नदीच्या ब्राह्मण घाटावर स्नानास गेला होता ही एक घटना घडली. ही घटनासुद्धा इतर घटनाप्रमाणे एक सामान्य घटनाच आहे. इतिहासलेखनात तिची नोंद एक सामान्य घटना म्हणून तळटीपेत येऊ शकते. परंतु या उत्तर पेशवाईतील कालखंडावर जेव्हां एखाखा इतिहासकार पुणे जिल्ह्यातील घोडनदी जवळ झालेल्या लढाईचा तपशील देईल त्यावेळी तो एका बाजूला तमाम देशस्थ ब्राह्मण व दुसऱ्या बाजूस तमाम चित्पावन ब्राह्मण घोडनदीला लढत होते असे सांगेल. परंतु ते का लढत होते याबद्दल तो विविध तर्क सांगेल. दुसरा इतिहासकार या लढाईचे तात्कालीक कारण 'पेशव्यांचे नाशिक क्षेत्री गोदावरीच्या ब्राह्मणघाटावर स्नानास जाणे' या घटनेत शोधील तर तिसरा इतिहासकार तपशीलाच्या मुळाशी जाऊन अनेक घटनांची साखळी बांधील आणि निष्कर्ष काढील की दुसरा बाजीराव नाशिक क्षेत्री गेला असता तेथील ब्राह्मण घाटावर गोदावरी स्नानाला त्याला मज्जाव करण्यात आला. कारण तो देशस्थ ब्राह्मणांचा घाट होता आणि पेशवे राजे असले म्हणून काय झाले? ते राजे असले तरी कोकणस्थ आहेत आणि कोकणस्थ हे देशस्थांच्यापेक्षा हीन दर्जाचे. त्यांना ब्राह्मण घाटावर देशस्थ स्नानाची परवानगी कशी देणार ? कारण देशस्थ ब्राह्मणांनी

चित्पावनांची आपणाबरोबर समानता आहे असे केंव्हाच कबूल केलेले नव्हते. पुरंदऱ्याच्या सारख्या घरंदाज देशस्थाच्या सदरेत खुद्द पेशव्यांची पंगत निराळीच असे. त्यामुळे या दोन पोट जातीतील सुप्त तेढ घोडनदीच्या लढाईत जगजाहीर झाली. म्हणजे दुसऱ्या बाजीरावाची गोदावरीवरील ब्राह्मणघाटावर स्नानाला जाण्याची ही घटना एका इतिहासकाराच्या तळटीपेचा, दुसऱ्याच्या ग्रंथलेखनातील मूळ भागाचा, तिसऱ्याच्या एखाद्या शोधनिबंधाचा तर चौथ्याच्या स्वतंत्र ग्रंथ निर्मितीचा विषय होऊ शकतो. याचा सरळ अर्थ असा आहे की, इतिहासकार एखाद्या घटनेकडे कोणत्या दृष्टीकोणातून बघतो यावर त्या घटनेचा दर्जा अवलंबून असतो. इतिहासातील कोणतीही घटना स्वतःच स्वतःचा दर्जा ठरवीत नसते तर इतिहासकार त्या घटनेला त्याच्या मनाप्रमाणे दर्जा प्राप्त करून देत असतो. त्यामुळे आज आपल्या समोर जो लिखित इतिहास आहे तो म्हणजे दुसरे तिसरे काही नसून इतिहासकारांनी त्यांच्या मर्जीप्रमाणे केलेल्या ऐतिहासिक घटनांचा संग्रह आहे. त्या घटना जशा निवडक आहेत तशाच त्या निवडीमागे इतिहासकारांचा त्या घटनाकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टीकोण असतो. त्यामुळेच इतिहासातील घटना स्वतःच बोलक्या असतात. त्यांना स्वतंत्र अस्तित्व असते आणि इतिहासकार पूर्वग्रहरहित असतात या म्हणण्याला निदान उपलब्ध इतिहास लेखनात तरी फारसे स्थान दिसत नाही.

घटनांचे मूल्यमापन

या विवेचनावरून आपल्यासमोर इतिहास लेखनासंबंधी जो प्रश्न निर्माण झालेला आहे, तो हा की, गतेतिहासातील असंख्य घटनांच्यामधून काही निवडक घटनाच इतिहासकार आपल्या लेखनात का निवडतो. त्या निवडण्यासाठी त्याच्याकडे काही कसोट्या आहेत का ? इतिहासकार इतिहासलेखन करतांना घटनांची निवड कशावरून करतो ? त्याचे उगमस्थान कोठे असते ? आपले बरेचसे इतिहास लेखन आपण काळजीपूर्वक पाहिले तर आपल्याला असे दिसेल की, या घटना शोधण्याचे आपल्या इतिहासकारांचे मुख्य ठिकाण आहे ते जुने दस्तऐवज, जुने रेकॉर्ड. त्यानंतर आपल्या इतिहासकारांनी धर्मग्रंथांच्या नावांनी आजवर जे लिहिले गेलेले आहे त्याचाही भरपूर उपयोग केलेला आहे. इतिहास लेखनात या ऐतिहासिक घटनांचे आणि जुन्या दस्तऐवजांचे फार महत्व आहे. परंतु केवळ ऐतिहासिक घटना आणि जुन्या कागदपत्रांचे दस्तऐवज स्वतःच इतिहास बनवीत नसतात. ते काम तर इतिहासकारांचे आहे. त्यालाच या ऐतिहासिक घटना शोधून काढायच्या असतात आणि जुनी कागदपत्रे धुंडाळायची असतात. परंतु या जुन्या कागदपत्रात घटनांच्या ज्या नोंदी असतात त्या तरी विश्वसनीय असतात का ? या नोंदी

करणांच्या लेखकांचे त्या घटनांच्याकडे बघण्याचे दृष्टीकोण समजावून घेतल्याशिवाय त्या नोंदीतील सत्यासत्यता कशी समजेल ? आपल्याकडे या नोंदींनाच इतिहासाची अस्सल साधने समजण्याची प्रथा दीर्घकाळ होती. त्यामुळे राजवाडे वगैरे इतिहास संशोधकाकडूनही इतिहास लेखनात आणि सामाजिक प्रश्नावर विशिष्ट भूमिका घेण्यात प्रचंड गफलती झालेल्या आहेत. शिवचरित्रातील वाकेनशी टिपण हे त्याचे उत्तम उदाहरण सांगता येईल. त्याच प्रमाणे इतिहासकार जे जुने कागदपत्र वाचण्याचा प्रयत्न करतो, त्यातून ऐतिहासिक घटना शोधण्याचा प्रयत्न करतो ती कागदपत्रे तरी त्याला नीट समजलेली असतात का ? निदान त्या कागदपत्रातील विशिष्ट नोंदी करीत असतांना त्यांच्या लेखकांनी त्यासंबंधी स्वीकारलेली भूमिका तरी या इतिहास लेखकांना माहित असते का? याबद्दल वाद होऊ शकतो. परंतु बहुतांश इतिहासलेखनात ही समज शंकास्पद दिसते. जुने कागदपत्र वाचतांना ते इतिहासकारांना नीट न समजल्यामुळे अनेक घोटाळे झालेले आहेत. सेतु माधवराव पगडी यांनी त्यापैकी काही दाखवून दिलेले आहेत. त्यांना त्यांनी ' इतिहास संशोधनातील विनोद ' म्हटलेले आहे. परंतु या गोष्टी इतिहास लेखनाच्या संदर्भात अतिशय गांभिर्याने घ्यावयाच्या असतात. हे घोटाळे केवळ दुय्यम दर्जाचे इतिहासकारच करतात असे नाही तर पहिल्या दर्जाच्या मानल्या गेलेल्या इतिहासकाराकडूनही ते झालेले आहेत. जदुनाथ सरकारांच्या पासून तो वा. सी. बेन्द्रे, सरदेसाई आणि शेजवलकर, हे इतकेच नव्हे तर राजवाडे यांच्याकडूनही ते झालेले आहेत. उदाहरणादाखल येथे काहींचा उल्लेख करता येईल. औरंग-जेबाचा चिटणीस साकी मुस्तैदखान याने ' मासिरे आलमगिरी ' या नावाचे औरंगजेबाचे चरित्र लिहिलेले आहे. त्यात औरंगजेबाने इ. स. १७०३ च्या एप्रिल महिन्यात सिंहगड किल्ला घेतला. त्याने त्या किल्याचे नांव ' बख्शिदाबख्श ' असे ठेवले. इ. स. १७०४ मध्ये औरंगजेब कर्नाटक प्रांतातील बेडर जमाती विरुद्ध लढण्यासाठी गेला. त्याची पाठ फिरताच मराठ्यांनी सिंहगड पुन्हा जिंकला. औरंगजेब जेव्हा इ. स. १७०६ मध्ये अहमदनगर भागात आला त्यावेळी त्याने आपला सेनापती जुल्फिकारखान यास सिंहगड परत जिंकून घेण्यासाठी रवानगी केली. त्याने सिंहगड म्हणजेच बख्शिदाबख्श परत जिंकून घेतला ही हकीकत लिहिलेली आहे. जदुनाथ सरकार यांनी या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर केलेले आहे. आणि त्यातील हा मजकूर वा. सी. बेन्द्रे यांनी त्यांच्या छत्रपती संभाजी महाराज या ग्रंथात मराठी भाषांतर करून समाविष्ट केला आहे. त्यांनी लिहिले आहे. " २३ जानेवारी १७०६ रोजी जेव्हा बादशाहाची स्वारी अहमदनगरास जाण्यास निघाली तेव्हा नसरत जंगखान यास बक्षीस देऊन बक्षेन्द्रबक्ष याचेवर रवाना केले " आणि पुढे लिहिले आहे " हरकाऱ्यांनी बादशहाकडे बातमी आणली की नस्रतजंगने बक्षेन्द्र बक्षीस पुन्हा पकडले. "

वास्तविक पाहता बख्शिदाबक्ष हे सिंहगडाला औरंगजेबाने दिलेले नाव. जुल्फिकारखान नुसरतजंग याने हा गड पुन्हा जिंकला. जदुनाथांनी 'रिक्याप्चर' असा इंग्रजी शब्द वापरला आहे. परंतु बेन्द्रे यांच्या अनुवादात बख्शिदाबख्श हा किल्ला बक्षेन्द्र बक्षी नावाचा माणूस झाला आणि नुसरतजंगाने या व्यक्तीस पुन्हा पकडले या प्रकारे बेन्द्रे यांनी भाषांतर केलेले आहे. हे इंग्रजीचे मराठी भाषांतर करतांना झालेले घोटाळे आहेत. परंतु इंग्रजी लेखकांनी ज्या विविध भाषातील साधनांवरून आपल्या ऐतिहासिक घटना शोधलेल्या असतात त्या भाषांमधील शब्दांचे योग्य भाषांतर केलेले असते काय ? जर मूळ इंग्रजी भाषांतरच चूक असेल तर त्याचा आधार घेणारेही चुकणारच. छत्रपती संभाजी महाराज या ग्रंथाच्या पृ. २३६ वर बेन्द्रे यांनीच इ. स. १६८२ मध्ये मोगलांनी रामसेजच्या किल्ल्याला वेढा घातला त्याचा मजकूर दिला आहे तो असा, "नंतर काही दिवसांनी एके दिवशी खानजहान बहादूरच्या पागेतील मोतद्दाराने काही जादूटोणा करून किल्ला घेऊन देतो म्हणून सांगितले. त्या म्हणण्याप्रमाणे बहादूरखानाने त्यांस शंभर तोळे सोन्याचा एक नाग करून दिला. तो घेऊन तो गड चढू लागला इतक्यात किल्ल्यावरून रेशमाचा चेंडू आला व त्याच्या छातीत जोराने बसला व त्याच्या जवळील नाग घेऊन गेला." हे वर्णन मूळ फारशी भाषेत आहे. त्याचे मूळ इंग्रजी भाषांतरच चुकलेले आहे. मूळ फारशी मजकूरात रेसमान म्हणजे दोर असा शब्द आहे. इंग्रजी भाषांतरकारांनी रेसमान या शब्दाचे भाषांतर दोर असे न करता रेशिम असे केले आहे. ख्वाफीखान या फारशी इतिहासकाराला मराठ्यांनी गोफणाचा मारा केला असे म्हणावयाचे आहे. गोफणातून दगड आला तो मोतद्दाराच्या छातीत आदळला त्यामुळे त्याच्या हातात असलेला सोन्याचा नाग उडून पडला आणि तो मोतद्दार कोलमडून खाली कोसळला असा खरा मजकूर असतांना मराठी अनुवादात रेशमाचा चेंडू येणे आणि चेंडूने सोन्याचा नाग घेऊन जाणे, असा विनोद निर्माण झालेला आहे.

आपले श्रेष्ठ इतिहासकार जदुनाथांच्या कडूनही असे घडले आहे. संभाजी राजे संगमेश्वर येथे मोगलांच्या हाती सापडले यासंबंधी लिहितांना मासिरे अलमगीरीचा कर्ता हा अलंकारीक भाषा वापरतो. तो म्हणतो "कोल्ह्याच्या वृत्तीचा तो (म्हणजे संभाजी) कवि कलशाच्या हवेलीरूपी भोकात म्हणजे बिळात लपला" जदुनाथांनी इंग्रजी भाषांतर केले ते असे "संभाजी हा कवी कलशाच्या वाड्यात एक भोक होते त्यात लपला." आता भोक म्हणजे काय हा आपल्या इतिहासाभ्यासकांना प्रश्न पडला त्यांनी वाड्यातील भोक म्हणजे तळघर, पेव, बळद असे अर्थ घेऊन संभाजी राजे हे तळघरात किंवा पेवात अगर बळदात लपून बसले असा अर्थ काढला. दुसऱ्या एका अनुवादातही जदुनाथांच्याकडून असेच घडले. मराठ्यांचे

किल्ले घेत औरंगजेब फिरत होता. त्याकाळात मोगलांचे अतिशय हाल झाले. असंख्य असे मोगल सैनिक सर्वस्वाला मुकून इतस्ततः भटकू लागले. या संबंधात जो फारसी वाक्प्रचार आहे तो म्हणजे आपले सामान कोंबडयावर लादणे असा आहे. कोंबडयाची पाठ ती काय आणि तिच्यावर सामान किती लादणार ? म्हणजेच त्या माणसापाशी काहीच राहिले नाही असा अर्थ घ्यावयाचा. पण जदुनाथांनी त्या वाक्याचे शब्दशः भाषांतर केले. मूळ ग्रंथातील ' लोक भटके बनले ' या वाक्याचा अर्थ जदुनाथानी असा घेतला की ' मोगल सैन्यात भटक्या जमाती म्हणजे जिप्सी जमाती होत्या ' आणि पुढे लिहिले की " सैन्यातील जिप्सींनी आपले सामान आपल्या कोंबडयावर लादले. " काय सांगावे उद्या एखादा इतिहासकार या जिप्सींच्या शोधास निघू शकेल. अशा चुका राजवाडे आणि शेजवलकरांच्याकडून सुद्धा झालेल्या आहेत. त्यांची अधिक माहिती देण्याची या ठिकाणी आवश्यकता नाही.

आपण ही उदाहरणे याच्यासाठी घेतली की, इतिहास लेखक जुन्या कागद-पत्रावरून ज्या ऐतिहासिक घटनांच्या नोंदी करीत असतो त्या तो आपल्या मना-प्रमाणे करीत असतो आणि त्यांचा अर्थ तो आपल्या मगदूराप्रमाणे लावीत असतो.

आज आपण मध्ययुगातला कोणत्याही समाजाचा इतिहास वाचू लागलो तर आपल्याला असे दिसते की मध्ययुगीन माणसे फार धार्मिक होती असेच आपल्या मनावर बिंबते. त्याचप्रमाणे या इतिहासात मध्ययुगीन राजघराण्यातील प्रमुख व्यक्तींच्या हालचालीच्या नोंदींचा, त्यांच्या ऐश्वर्याचा आणि त्यांनी गाजविलेल्या शौर्याच्या कथाच आपल्याला वारंवार दिसतात. त्यामुळे मध्ययुगीन जीवन म्हणजे धार्मिकता आणि शौर्य यांचे मिश्रण आहे अशीच सर्वसाधारण वाचकांची समजूत होते. सामान्य माणसांच्या जीवनात ज्या वेळी बाकी कशातही रस रहात नाही. माणसे गांजलेली असतात आणि करण्यासारखे त्यांच्याकडे काहीही नसते त्यावेळी असे इतिहास त्यांना भारावून टाकतात. माणसे इतिहासात, भूतकाळात रममाण होतात. परंतु मध्य युगाचे हे धार्मिकता आणि शौर्याचे मिश्रण असलेले रूप आपल्या-समोर येते कसे ? ते तसेच का आणले जाते ? याचे प्रमुख कारण आपले इतिहास लेखन करणारे इतिहासकार ज्या बखरकारांच्या बखरीतून ऐतिहासिक घटना शोधतात ते बखरकार आहेत. या बखरकारांच्या बखरींचा जर चिकित्सकपणे अभ्यास केला नाही तर यापेक्षा वेगळे चित्र आपल्यासमोर उभेच राहू शकणार नाही. या संदर्भात एक महत्वाची गोष्ट आपल्याला कायम ध्यानात ठेवणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे हे सारे बखरकार एक तर मध्ययुगीन धर्मसंस्थेशी एक पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून निगडीत होते किंवा ते एखाद्या राजघराण्यातील एखाद्या गटाचे मानकरी तरी होते. त्यामुळेच त्यांच्या साऱ्या लिखाणाचा केन्द्र बिंदू

एकतर धर्म -संस्था तरी असतो किंवा राजघराण्यातील एखादा हितसंबंधी गट तरी असतो. यांचा परिणाम अटळपणे असा झालेला आहे की, त्यांच्या लेखनात धर्म–संस्थेला केन्द्रीभूत मानून इतर सर्व छोट्या मोठ्या घटनांची ऐतिहासिक घटना म्हणून या धर्मसंस्थेभोवती त्यांनी गुंफण केलेली दिसते. त्याचप्रमाणे त्यांचे सारे लेखन आपल्या गटातील राजा राणी आणि त्यांचे सरदार, त्यांचे ऐश्वर्य, आणि त्यांच्या वंशावळीवरच केन्द्रीत होते. हें सारे लेखन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे राज दरबाराशीच संबंधित असते. म्हणून मध्ययुगाचा जो इतिहास आपल्याला आज उपलब्ध आहे तो बहुतांश संपूर्ण समाजातील एका अतिशय छोट्या गटाभोवती फिरणारा आहे. समाजातील या फार लहान वर्तुळाचा हा इतिहास आहे. याच्या वाचनाने सामान्य वाचकाची दिशाभूल होते. या छोट्या गटाच्या इतिहासावरून संपूर्ण समाजाचा इतिहास असाच ऐश्वर्याने भरलेला होता असा त्याचा समज होतो. कारण तो या छोट्या गटाचा इतिहास म्हणजेच संपूर्ण समाजाचा इतिहास आहे असे मानतो. हा इतिहास धर्मसंस्था आणि राजघराण्याभोवतीच फिरत राहिल्याने आपल्याला त्या काळातल्या कोट्यावधी मानव समूहाचे जीवन कसे होते हे समजूच शकत नाही. आपल्याला शिवाजी - संभाजी माहीत आहेत. परंतु त्यांच्या राज्या-रोहणासाठी जी हजारो सामान्य माणसे आपल्या प्राणांना मुकली त्यांच्याबद्दल काहीच माहिती नाही. तान्हाजीने उदयभानूशी लढतांना जो त्याग केला तेवढाच आपल्याला माहीत आहे परंतु तान्हाजी आणि त्याचे अनेक साथीदार मावळे डोंगर कुशीतील ज्या झोपड्यामध्ये रहात होते. त्यांच्याबद्दल आपण काहीच जाणीत नाही. ते काय खात होते, त्यांचे कपडे कसे होते, त्यांच्या शेतात काय पिकत होते, त्यांचे जीवन कसे होते याबद्दल आपण फारसे काही सांगू शकत नाही. असे का होते तर आपण राजा राण्यांचा इतिहास म्हणजेच या सामान्य माणसांचा इतिहास मानतो. वस्तुतः तो तसा नसतो. सामान्यांची सुखदुःखे, त्यांचे संसार आणि त्यांचे कामजीवन राजे - राण्यांची सुखदुःखे त्यांचे संसार आणि त्यांचे कामजीवन यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. म्हणूनच मध्ययुगाचा पाश्चात्य इतिहासकार प्रा. बारक्लफ हा या मध्ययुगीन इतिहासाबद्दल अतिशय सूचक उद्गार काढतांना दिसतो. तो म्हणतो " आपण जो इतिहास वाचतो तो जरी वास्तव घटनांच्यावर उभा असला तरी, काटेकोरपणाने बोलायचे ठरले तर तो अजिबात वास्तविक नसतो. तर तो स्वीकृत निर्णयांची, ॲक्सेप्टेड जजमेंटची शृंखला असतो एका अर्थाने मध्य युगाचे जे चित्र इतिहास वाचून आपल्यासमोर उभे रहाते ते इतिहासकारांनी आपल्यासाठी आधीच निवडलेले, प्रिसिलेक्टेड आणि पूर्व नियोजित प्रिडिटर्मिन्ड असते. "

यावरून आपल्याला असे दिसते की, इतिहास हा काही निवडक घटनांचा संग्रह असतो आणि इतिहासकार इतिहासात घडलेल्या असंख्य घटनातून त्यांची

निवड करीत असतो. परंतु या ठिकाणी पुन्हा असा प्रश्न विचारता येईल की, इतिहासकार काही विशिष्ट घटनांचीच निवड कशी करतो. या प्रश्नाचे उत्तर बेन्डेटो क्रोसे यांनी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मताप्रमाणे सर्व इतिहास हा 'समकालीन इतिहास' असतो. त्यांना 'समकालीन इतिहास' म्हणजे असे म्हणावयाचे आहे की, इतिहास लेखनात ज्या घटनांचा समावेश असतो त्या घटनांच्याकडे आणि भूतकाळाकडे इतिहासकार आपल्या काळातील समस्या आणि आपल्याच काळातील दृष्टीने पहात असतो. त्यामुळे इतिहासकारांचे काम केवळ नोंदी करणे एवढेच मर्यादित नाही. त्याने केवळ घटनांची जंत्री करावयाची नसते. तर तो त्याला गवसलेल्या अनेक घटनांचे मूल्यमापन करतो आणि त्यानंतरच कोणत्या घटनांच्या नोंदी करून त्यांना ऐतिहासिक घटना मानावयाच्या व कोणत्या वगळायच्या हे तो ठरवीत असतो. क्रोसे म्हणतात ते जर खरे असेल तर मग इतिहासकाराने 'निर्लेप व निरहंकारपणाने इतिहासाचा विचार करावयाचा असतो' हे म्हणणे किंवा 'अमूक एका इतिहासकाराने केलेले लिखाण पूर्वग्रहरहित आणि निरहंकारी पद्धतीने केलेले आहे' या म्हणण्याला काय अर्थ शिल्लक रहातो. इतिहासातील घटनांचे मूल्यमापन केल्याशिवाय कोणत्या घटना नोंदी करण्याच्या लायकीच्या आहेत हे जर इतिहासकाराला कळूच शकत नसेल आणि हे मूल्यमापन जर तो स्वतःच्या मनाप्रमाणे आपल्या काळातील समस्या आणि दृष्टी घेऊन करीत असेल तर ते मूल्यमापन पूर्वग्रहरहित आणि निरहंकारी पद्धतीने होऊ शकेल काय? मला वाटते त्यासाठी इतिहासकाराला परमेश्वराचाच अवतार घ्यावा लागेल.

आज जे इतिहासकार मग ते इतिहास लेखनासंबंधी कोणता का दृष्टीकोण मानीत असेनात त्यांच्या लेखनात घटनांचे मूल्यमापन झालेलेच असते. ते मूल्यमापन चूक किंवा बरोबर असू शकेल परंतु ते अटळच असते. नाहीतर त्यांचा इतिहास केवळ घटनांची जंत्री बनला असता. माहितीचे ओझे झाला असता. पण इतिहासकार तर ते तसे होऊ देत नाही. त्याला आपला इतिहास वाचकांनी वाचावा असे वाटत असते. त्यासाठी तर तो त्याने निवडलेल्या घटनांची व्यवस्थित मांडणी करीत असतो. याचा अर्थ माहितीचे ओझे किंवा घटनांची जंत्री असे स्वरूप असलेले इतिहास लेखन आजिबात अस्तित्वात नाही असे नाही. तसे ते आहेतही.

आज आपल्यासमोर जे इतिहासलेखन आहे ते सारे आपल्या बखरकारांच्या आणि राजदरबारी नोंदी करणाऱ्या मानकऱ्यांच्या आधारावर केलेले आहे. त्या बाहेर जाऊन ऐतिहासिक घटना शोधण्याचा फार क्वचित प्रयत्न झालेला आहे. त्याच बरोबर आधुनिक इतिहासकारांनी आपापल्या कालखंडाच्या दृष्टीने या ऐतिहासिक घटनांच्याकडे पाहिलेले आहे. ज्या कालखंडात समाज जीवनात सतत धार्मिक, सामाजिक आणि राजकीय तणाव असतात त्या तणावांचे प्रतिबिंब

इतिहासकाराच्या दृष्टीत उतरणारच नाही याची शाश्वती नसते. असे इतिहास लेखन जेव्हा होते त्यावेळी अभिनिवेशाला उधाण येते किंवा तो सुप्त स्वरूपातही पेरला जातो. एकाच ऐतिहासिक घटनेचे दोन परस्पर विरुद्ध अर्थ लावता येतात. त्यामुळे इतिहास हा स्वतःच एक समंध नाही तर इतिहासकारांनी त्याला समंध बनविलेले आहे. इतिहासलेखन ज्यावेळी अशा अभिनिवेशी दृष्टीकोणातून लिहिले जाते त्यावेळी तो वाचणारा माणूस शहाणा बनण्या ऐवजी पागल बनत असतो. असे होण्याचे कारण इतिहासकारांनी आपल्या लेखनाला कधी धर्मसंस्थेला केन्द्र मानून तर कधी राजघराण्यांच्या राजवटीला केंद्र मानून इतिहासलेखन केलेले आहे. त्याचा परिणाम हे इतिहासलेखन मानवी समाजाच्या फार थोड्या वर्तुळाभोवती फिरतांना दिसत आहे. धर्मसंस्था आणि राज-घराण्यांच्या वर्तुळाच्या बाहेर जाऊन जेव्हा मानवी विकासाचा तपशिल इतिहासात दडून बसलेल्या घटनांच्या सहाय्याने लिहिला जाईल त्यावेळी तो एका धर्माचा, एका घराण्याचा इतिहास रहाणार नाही आणि तो लिहितांना मानवी दृष्टी लाभेल. आपण इतिहासाचा विचार माणूस आणि त्याच्या सामाजिक संबंधाच्या संदर्भात करीतच नाही. त्यामुळे तर आपल्या इतिहासलेखनात चुकीचे कालखंड पाडण्याची प्रथा निर्माण झालेली आहे. आपल्याला आपल्या इतिहासात हिंदुकालखंड, मुस्लीम कालखंड दिसतो. तो आपल्या असंख्य वाचकांना आवडतो कारण त्यांचे हिंदु मन हिंदुकालखंडात रमते, मुस्लीम मन मुस्लीम कालखंडात रमते आणि आधुनिक मन ब्रिटिश कालखंडात रमते. आपण या प्रकारचा कप्पेबंद इतिहास मान्य केला म्हणून आपण व्यापक दृष्टीने इतिहासाकडे पाहिले नाही. असा व्यापक इतिहास लिहिता येणे शक्य आहे का ? इतिहास माणसाला पागल बनविण्याऐवजी शहाणा बनवू शकेल का ? या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी आहेत. ती देण्यापूर्वी भारताच्या इतिहासाचे लेखन कोणी कसे केले ते पहिल्यांदा बघावे लागेल आणि मग हा हिंदूंचा इतिहास, हा मुसलमान किंवा शिखांचा इतिहास, हा अस्पृश्य किंवा भटक्यांचा इतिहास, या ऐवजी हा मनुष्य जातीचा इतिहास आहे. त्यामुळे तो माझा इतिहास नसून आपल्या सर्वांचा तो आहे अशी भावना, असे शहाणपण देणारे इतिहास लेखन कसे करता येईल याचा विचार करावा लागेल.

आज आपल्या समोर मला यापेक्षा अधिक बोलायचे होते. परंतु आज मी या व्याख्यानात आपल्याला एवढेच सांगितले आहे की, इतिहास लेखन करणारी माणसे ही माणसेच असल्यामुळे त्यांचा इतिहास लेखन हा शेवटचा शब्द मानण्याचे काही कारण नाही. हे इतिहास लेखन अभिनिवेशी का होते आणि ते समाजाच्या फार छोट्या वर्तुळापुरतेच मर्यादित कसे आहे ते वाचून हाच जणू संपूर्ण समाजाचा इतिहास होता असा गैरसमज करून घेता कामा नये. इतिहास लेखनाबद्दल आपली

जिज्ञासा अधिक जागृत व्हावी म्हणून काही प्रश्न तसेच निरुत्तरीत ठेवले आहेत. ज्यावेळी माझा ' धर्म आणि इतिहास लेखन ' हा ग्रंथ प्रकाशित होईल आणि तो लवकरच होईल असे वाटते त्यावेळी या प्रश्नांची विस्ताराने त्यात चर्चा केलेली आपणास बघावयास मिळेल.

आपल्या नगराध्यक्षांनी या व्याख्यानमालेचे निमंत्रण दिले, आपले ग्रंथपाल विठ्ठलराव पाटील हे मला या ठिकाणी घेऊन आले आणि आपण दोन दिवस एवढ्या संख्येने येऊन ही व्याख्याने शांतपणे ऐकलीत याबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे.

जय हिंद !

व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषय

व्याख्याते		विषय
वर्ष – पहिले १९७३		
प्राचार्य देवदत्त दाभोळकर,	पुणे	राजकारण आणि समाजजीवन
डॉ. मा. पं. मंगुडकर,	पुणे	भारतीय समाजवाद, काही विचार
प्रा. गं. बा. सरदार,	पुणे	भारतीय समाजवाद, आणि ऐहिक निष्ठा
वर्ष – दुसरे १९७४		
प्रा. ए. एम्. खान, श्री शाहू मंदीर महाविद्यालय,	पुणे	भारतीय लोकशाही : काही विचार
श्री. वि. अ. नाईक, माजी न्यायमूर्ती	पुणे	लोकशाही समाजवाद
कै. सदाशिव बागाईतकर,	पुणे	अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप
वर्ष – तिसरे १९७५		
कै. डॉ. भा. शं भणगे,	मुंबई	आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग
श्री. त्र्यं. कृ. टोपे,	मुंबई	समाज सुधारणेच्या समस्या
डॉ. प्र. चि. शेजवलकर संचालक, इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च,	पुणे	सद्य: स्थिती
वर्ष – चौथे १९७६		
श्री. गोपाळराव मयेकर, माजी शिक्षणमंत्री,	गोवा	भारतीय समाजवादाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग (दोन व्याख्याने)
कै. पद्मभूषण धनंजय कीर, प्रसिद्ध चरित्रकार,	मुंबई	राजर्षी छत्रपती शाहू आणि नव-भारताची मागणी

वर्ष – सहावे १९७८

डॉ. भालचंद्र फडके,	पुणे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती

वर्ष – सातवे १९७९

कं. आमदार पी. बी. साळुंखे,	कोल्हापूर	महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे (दोन व्याख्याने)
डॉ. सत्यरंजन साठे	प्राचार्य, लॉ कॉलेज पुणे	भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन

वर्ष – आठवे १९८०

डॉ. जनार्दन वाघमारे,	प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर	महाराष्ट्रातील राजकारण व समाज–कारण कालचे, आजचे व उद्याचे (दोन व्याख्याने)
खासदार प्रतापराव भोसले,	माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य	शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान

वर्ष – नववे १९८१

मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	प्रमुख संपादक मराठी विश्वकोश वाई	विज्ञान आणि मानवी मूल्ये (तीन व्याख्याने) पुस्तक रूपाने प्रकाशित झाली नाहीत.

वर्ष – दहावे १९८२

मा. नानासाहेब गोरे,	पुणे	महाराष्ट्र धर्माची नवी व्याख्या (दोन व्याख्याने) पुस्तकरूपाने प्रकाशित झाली नाहीत.

वर्ष – अकरावे १९८३

बॅ. पी. जी. पाटील,	सातारा	[कराड शहरात १२ ते २१ मार्च अखेर जमावबंदी, शस्त्रास्त्रबंदी आदेश जारी केलेला असल्याने नियोजित व्याख्याने होऊ शकली नाहीत.]
मा. तात्यासाहेब कोरे,	वारणानगर	
सौ. शांताबाई किर्लोस्कर,	पुणे	

वर्ष – बारावे १९८४

श्री. वसंत पळशीकर,	मंचर	कार्ल मार्क्स – जीवन, विचार आणि समाजशास्त्र (तीन व्याख्याने) पुस्तकरूपाने प्रकाशित झाली नाहीत.

वर्ष – तेरावे १९८५

डॉ. पंजाबराव जाधव,	पुणे	(रशियाचे राष्ट्राध्यक्ष श्री. कॉन्स्टन-
श्री. द्वा. भ कर्णिक,	मुंबई	टाईन चेर्नेको यांचे निधनानिमित्त नियोजित व्याख्याने होऊ शकली नाहीत)

वर्ष – चौदावे १९८६

श्री. द्वा. भ. कर्णिक,	मुंबई	१) यशवंतराव आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन २) यशवंतराव चव्हाण : कॉंग्रेस संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते ३) दिल्ली दरबारातील यशापयशाची मीमांसा (तीन व्याख्याने)

वर्ष – पंधरावे १९८७

डॉ. रावसाहेब कसब,	संगमनेर	धर्म आणि इतिहास लेखन (दोन व्याख्याने)

आणि यंदाच्या १९८८ व्याख्यानमालेत-

वर्ष – सोळावे १९८८

ॲड. डॉ. पंजाबराव जाधव,	पुणे	'भारतीय बहुजनसमाजाच्या प्रगतीची वाटचाल' (दोन व्याख्याने) पुस्तकरूपाने प्रकाशित झाली नाहीत.

' यशवंतराव चव्हाण स्मृती सदन '

कराड नगरपालिकेचे - सांस्कृतिक केंद्र